# छात्र प्रबोधन

सौर ज्येष्ठ, शके १९३७ । वर्ष १५ अंक ९
वार्षिक वर्गणी ₹ २००/ मूल्य ₹ २०



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक !

# आव्हानांच्या गगनामध्ये

आव्हानांच्या गगनामध्ये
मुक्त आम्ही फिरणार
कर्तृत्वाचे पंख आमुचे
कधीच ना थकणार ।। ध्रु. ।।

अभ्यासाशी दोस्ती करूनी
हिरव्या डोंगरवाटा फिरूनी
चुस्त तनाने मस्त मनाने
गीत नवे रचणार ।। १ ।।

प्रतिभाशाली प्रज्ञा अमुची
ज्योत अंतरी विश्वासाची
शास्त्र कलांची करून साधना
वीरव्रती बनणार ।। २ ।।

असोत रस्ते बिकट, वाकडे
परंपरांची अंध झापडे
जन्मजात भेदांच्या सीमा
उल्लंघून जाणार ।। ३ ।।

एकाकी ही वाट नसावी
सन्मित्रांची साथ असावी
स्वप्न उद्याचे सत्य बनविण्या
शर्थ आम्ही करणार ।। ४ ।।



# छात्र प्रबोधन

सौर ज्येष्ठ, शके १९३७। वर्ष १५ अंक ९

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २७५ वा अंक, वर्ष २३ अंक ११

प्रकाशन दिनांक - सौर ११ ज्येष्ठ, शके १९३७/१ जून २०१५


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

## • अंतरंग •


४. **संवाद** - महेन्द्र सेठिया

५. कथा... **कुठे गेली नीरजा?** - नीलिमा करमरकर

११. प्रासंगिक... **भूकंप : एक विनाशकारी संकट** - डॉ. श्रीकांत कार्लेकर

१४. भटकंती... **निसर्गसंपन्न बांधवगड** - सुजाता लेले

१७. कविता... **डोंगर** - मुबारक शेख

१८. नियोजन तक्ता... **माझे संकल्प**

२१. अभ्यासातील स्वावलंबन...
**चला करूया इतिहासाचा अभ्यास** - सुहासिनी देशपांडे

२५. कथा... **ढोल्या** - डॉ. महेश केळुसकर

२८. कविता... **ऊठ मुला** - एकनाथ आव्हाड

२९. ललित... **कोरा स्पर्श-कोरा गंध** - सुनीला गोंधळेकर

३२. मुलांचे पान : कथा... **गुहेचे रहस्य** - कु. वेदाक्षी जोगळेकर

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य...
**आव्हानांच्या गगनामध्ये** - वाच. अनघा लवळेकर

**याशिवाय –** किस्से थोरामोठ्यांचे...(१६), बौद्धिक खेळ, पेनाचा इतिहास (२०), आदरांजली (३१), प्रतिसादी वाचकवीर व्हा..., जरा हसूया... (३४)

**तळटिपेतील ओळी –** जरूर भेट द्यावीत अशी संग्रहालये


### मुखपृष्ठाविषयी

जलरंगाच्या माध्यमातून साकारलेले देवळाचे मुखपृष्ठ हे मी सोमवार पेठ, त्रिशुंड गणपती मंदिर, पुणे येथे मंदिरासमोर प्रत्यक्ष बसून चितारलेले आहे. मंदिराचा परिसर, तेथील पूजा करणारी महिला, काही नागरिक हे चित्रामध्ये उमटले आहेतच; पण देवळाच्या दगडी बांधकामावर पडलेली कोवळी सूर्यकिरणं जलरंगाच्या माध्यमातून टिपण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**– कुडल हिरेमठ**


**♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦**
महेन्द्र सेठिया

**♦ कार्यकारी संपादक ♦**
शिल्पा कुलकर्णी

**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन

**♦ मुखपृष्ठ ♦**
कुडल हिरेमठ

**♦ आतील चित्रे ♦**
भरत केतकर,
साहिल उपळेकर



**♦ संपर्क पत्ता ♦**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org

**ई-मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org



**मासिकाची वर्गणी**

**वार्षिक : ₹ २००,** द्वैवार्षिक : ₹ ४००, त्रैवार्षिक : ₹ ५५०, दशवार्षिक : ₹ १,७००.
या अंकाची किंमत : ₹ २०
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी- ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.**


**छात्र प्रबोधन :** निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

**जरूर पाहा : जवाहरलाल नेहरू संग्रहालय,** इटानगर, अरुणाचल प्रदेश (अरुणाचल प्रदेशातील भटक्या जमातींची माहिती)

**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

**संवाद**

**मदतीसाठी तत्पर असू इच्छिणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,**

मागच्या महिन्यात नेपाळमध्ये भूकंपाचे तीव्र धक्के बसले आणि मोठ्ठ्या प्रमाणावर जीवित अन् वित्तहानी झाली. भारताच्या लगतचा देश, आपल्याच सांस्कृतिक वारशाचा हिस्सा असलेल्या अन् हिमालयाच्या कुशीत वसलेल्या या देशातील जनतेसाठी आपण मदत गोळा केली पाहिजे, असं वाटून आपल्या डोंबिवलीतील युवक–युवती प्रबोधकांनी शेकडो लोकांना भेटून लाखभर रुपयांची मदत गोळा केली. मला त्यांचं विशेष कौतुक वाटलं, आनंदही झाला. पण कोणीतरी अडचणीत आहे, संकटात आहे त्यांना मदतीची गरज आहे हे समजल्यावर हातातील चार कामं /मजेच्या/ आवडीच्या गोष्टी/ आळस आणि निवांतपणा थोडा बाजूला ठेवून त्यांच्यासाठी मदत गोळा करणं, मदतीसाठी जाणं हे जिवंतपणाचं लक्षण आहे. दुर्दैवाने ते कमी होत चाललंय म्हणून या गटाचं विशेष कौतुक. छात्र प्रबोधनच्या सर्व वाचक–सभासद–प्रबोधकांनी असा जिवंतपणा जपायला हवा; असं मला मनापासून वाटतं.

आपण कोणाच्यातरी उपयोगी पडावं, आपल्याला कोणाला तरी मदत करता यावी असं तुम्हाला मनापासून वाटतं का? तसं वाटणं ही या दिशेने जाणारी पहिली महत्त्वाची पायरी. यासाठी स्वकेंद्रित – स्वत:पुरताच विचार करण्याची स्वार्थी वृत्ती कमी करत जायला हवी. 'यातून मला काय मिळणार?' अशी फायद्याची भाषाही सोडून द्यायला हवी. आपल्याच अडचणींचा पाढा वाचत राहाणं कमी करायला हवं. आपल्यापेक्षाही अधिक अडचणींमध्ये राहाणाऱ्या व्यक्ती जवळून पाहायला हव्यात. थोर नेत्यांची, संतांची चरित्रं वाचायला हवीत. त्यातून हळूहळू आपण इतरांच्या उपयोगी पडलं पाहिजे, मदतीला धावून गेलं पाहिजे असं वाटायला लागेल.

'मला मदत करण्याची खूप इच्छा आहे; पण कोणी माझ्याकडे मदत मागतच नाही,' असंही बऱ्याच जणांच्या बाबतीत घडतं. तेव्हा कोणीतरी मदत मागण्याची वाट पाहाण्यापेक्षा कोणाला, कुठे मदतीची गरज आहे हे आपल्याला शोधता येईल का? त्यासाठी आजूबाजूच्या लोकांबद्‌दलची, परिस्थितीबद्‌दलची संवेदनशीलता असावी लागते. कोणाला बरं वाटत नाहीये, कोणाला अभ्यासात मदतीची गरज आहे, कोणाला काही कामे करण्यात मदत हवी आहे हे स्वत:हून कळायला हवं. सांगितल्यावर मदत करणं, हे चांगलंच पण न सांगता मदतीची गरज जाणवणं आणि ती स्वत:हून, मनापासून , आनंदानं करणं हे अधिक चांगलं.

मदत करण्याची इच्छा असली अन् मदत करायची गरजही जाणवली तरी मदत करता येतेच असे नाही. कोणालातरी गणिताच्या अभ्यासात मदतीची गरज आहे. हे कळलं, मदतीची इच्छाही असली तरी स्वत:चं गणित चांगलं नसेल तर तुम्ही मदत करू शकणार नाही. बसमध्ये एखादा धटिंगण कोणातरी मुलीशी /वृद्ध व्यक्तीशी अरेरावी करतोय, अन्याय करतोय हे समजतंय, त्या मुलीला/वृद्ध व्यक्तीला मदत करण्याची तीव्र इच्छा आहे; पण तेवढी ताकदच नसेल तर! तेव्हा इतरांच्या उपयोगी पडण्यासाठी, मदत करण्यासाठी स्वत: सक्षम, सामर्थ्यवान, अनेक कौशल्यांनी युक्त असायला हवं. तरच आपण अनेकांच्या उपयोगी पडू शकू.

मदत करण्यासाठी तत्पर व्हायचं असेल तर मदत करण्याची मनापासूनची इच्छा हवी, स्वत:हून मदत करता यावी यासाठी संवेदनशीलता, आस्था, आत्मीयता हवी अन् मदत करता येण्यासाठीचे सामर्थ्य, सक्षमता हवी. या सगळ्यासह जेव्हा आपण कोणाला तरी प्रत्यक्ष मदत करू शकतो तेव्हा होणारा आनंद, वाटणारं समाधान विलक्षण असतं, अवर्णनीय असतं. अर्थात अशी मदत करताना परतफेडीची अपेक्षा ठेऊ नये. मदत करतोय म्हणजे उपकार करतोय अशी भावना त्यात येणार नाही, अशीही काळजी घ्यायला हवी. आपल्या मदतीमुळे आपण दुसऱ्याला कमी तर लेखत नाही ना/त्याला दुबळे तर करत नाही ना, हेही पाहायला हवं. मदत करण्याची संधी दिसली ते आमचं भाग्य, असं खरंतर आपल्याला वाटायला हवं. तसं झालं तर मिळणारा आनंद अनेक पटींनी वाढेल, तो आनंद दीर्घकाळ टिकेल.

आपण सर्व प्रबोधकांनी असं वेळोवेळी छोट्या मोठ्या प्रसंगांमध्ये मदतीसाठी तत्पर असायला हवं. येत्या शैक्षणिक वर्षात 'अनेकांच्या उपयोगी पडणारा होईन, अनेकांना मदत करण्यासाठी तत्परतेने, उत्साहाने पुढाकार घेईन', असा संकल्प तुमच्यातला प्रत्येकजण करेल का? त्यासाठी तुम्ही संवेदनशीलता आणि विविध प्रकारच्या क्षमता अन् कौशल्ये जाणीवपूर्वक मिळवाल का? वाढवाल का? तुमच्या आसपास मदतीसाठी तत्पर असणाऱ्या व्यक्तींचा शोध घ्याल का? त्यांच्या सहवासात राहाण्याचा प्रयत्न कराल का? हे सर्व तुम्ही करायचं ठरवावं आणि ते तुम्हाला पूर्ण करता यावं यासाठी मनापासून शुभेच्छा!

**तुमचा दादा,**

**(महेन्द्र सेठिया)**



*वितळून जावे कांचन असे गर्द गहिरे ऊन। निळ्या नभावर उमटे उज्ज्वल नक्षत्राची खूण।*



**जरूर पाहा : दर्शन संग्रहालय,** पुणे (साधू वासवानी यांचे जीवनचरित्र ऑडिओ, व्हिडिओच्या साहाय्याने दाखवले जाते.)

**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे** - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

# कुठे गेली नीरजा?

– नीलिमा करमरकर

**मालानं बघितलं, तर तिला तळ्याकाठी एकटीच नीरजा बसलेली दिसली. माला तळ्याच्या दिशेनं जाऊ लागली. जरा जवळ जाते न जाते तोच तिला पाण्यात धपकन् कोणीतरी उडी मारल्याचं जाणवलं; पण दिसलं मात्र कोणीच नाही. मालानं जरा नीट बघितलं तर एक मोठा मासा तिला दूर जाताना दिसला...**

दिवसभर मळभ दाटून आलं होतं. त्यात हा मुंबईचा जीवघेणा उकाडा. दमट हवा आणि घाम यामुळे हैराण करणारा. यावर्षी पाऊस खूपच लांबला होता. जून महिना उलटला, तरी पावसाचा पत्ता नाही. सारेजण पावसाची चातकाप्रमाणे वाट बघत होते. माला तिच्या छोट्याशा फ्लॅटमध्ये सकाळपासून एकटीच खिन्न होऊन बसली होती. कोंडलेल्या पावसाप्रमाणे मालाच्या मनात गेल्या काही वर्षातील नीरजाच्या आठवणी दाटून आल्या होत्या. आज तिचा जन्मदिवस ! कुठे असेल ती आणि कशी असेल?...

बरोबर दहा वर्षांपूर्वीचा प्रसंग मालाच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. त्यावेळी माला आणि तिचा नवरा जय नोकरीनिमित्त युरोपातील हॉलंड (नेदरलँड) या देशात राहात होते. मुख्य शहरापासून जरासं दूर असलेल्या छोट्या गावात त्यांचं छानसं टुमदार घर होतं. मागच्या बाजूला हिरवीगार झाडी आणि त्या झाडीत होतं एक छोटंसं तळं!

नेदरलँडची जमीन समुद्रसपाटीपासून जराशी खाली खचलेली असल्यानं भरतीच्या वेळी जोरदार लाटांचं किनाऱ्यावर नेहमीच आक्रमण होत असे. त्यापासून बचाव करण्यासाठी सरकारने किनारपट्टीवर मोठमोठ्या भिंती *(डाईक्स)* उभारल्या होत्या. सहसा त्या भिंती ओलांडून पाणी जमिनीवर येत नसे. पूर्वीच्या काळात पाणी आलंच तर उपसा करण्यासाठी पवनचक्क्या उभारल्या होत्या. आजकाल मोठमोठी *पंपिंग स्टेशन्स* सर्वत्र होती. खाऱ्या पाण्यापासून जमिनीचा बचाव करण्याच्या योजना सर्वत्र होत्या. गंमतीनं म्हटलं जायचं की, इथली मुले जन्मल्यापासून पाण्यात माशाप्रमाणे पोहायला शिकतात.





*फुला फळातून दाटून आले मातीचे ऐश्वर्य। मावेना नयनात असे हे रंग, गंध औदार्य।।*

**जरूर पाहा : नेहरू सायन्स सेंटर,** वरळी, मुंबई (विज्ञान व तंत्रज्ञान संग्रहालय)

**प्रायोजक – बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे**



त्यांना पाण्याचं भय नसतं.

अशा शांत, सुरक्षित वातावरणात जय आणि माला यांचं आयुष्य आनंदात चाललं होतं. खंत एकच होती, ती म्हणजे त्यांना मूलबाळ नव्हतं. पण माला लहान मुलांच्या शाळेत शिकवत असल्यानं ती त्या मुलांच्यात रमत असे. असे दिवस चालले असता साऱ्या देशाला ढवळून काढणारी एक घटना घडली. या देशात पूर येण्याचं संकट नेहमीच ओढवत असे. पण यावेळी पश्चिम किनारपट्टीवर अटलांटिक महासागराच्या प्रचंड मोठमोठ्या लाटा येऊन धडकू लागल्या. जवळपासच्या गावांना धोक्याची सूचना दिली गेली. मोठमोठ्याने *सायरन* वाजू लागले. रेडिओ आणि टीव्हीवरून लोकांना दक्षतेचा इशारा वारंवार देण्यात येत होता. किनारपट्टीच्या जवळपासचे लोक घर सोडून बाहेर पडले. काही त्या तयारीत होते. उंच उंच उठणाऱ्या लाटांचं थैमान सुरू झालं. मोठमोठ्या *डाईक्सचा* त्यापुढे टिकाव लागला नाही. पवनचक्क्या उन्मळून पडल्या आणि *पंपिंग स्टेशन्स* बंद पडली. बहुदा सागरतळाशी भूकंप झाल्याने ही 'त्सुनामी' आली. सर्वत्र हाहा:कार माजला. जीव घेऊन पळून जाणारे बहुतांश वाचले. घरे पत्त्यासारखी कोसळली. पाण्याबरोबर माणसे, झाडे, वाहने सर्व वाहत येत होते. कित्येक तास लाटांचं चाललेलं तांडव हळूहळू थंडावलं.

त्यानंतरचं दृश्य मात्र भयानक होतं. राडारोडा, चिखल, प्रेतं... अनेक स्वयंसेवक कामाला लागले. जगभरातून पुनर्वसनासाठी मदतीचा ओघ सुरू झाला. या सर्व आपत्तीमध्ये काही आश्चर्यकारक घटना घडल्या. काही छोटी बाळं लाकडी पाळण्यातून तरंगत सुरक्षित राहिली. काही माणसं फळकुटांच्या आधारे वाचली तर काही लाटांच्या माऱ्याने दूरवर फेकली गेली, नाकातोंडात पाणी जाऊन मरण आलेलेही अनेक दुर्दैवी जीव होते.

जय आणि माला रोज टीव्हीवर सर्व दृश्ये आणि बातम्या बघत होते. त्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत तर केलीच पण मालाने खूपसे गरम कपडे घरोघर जाऊन गोळा केले व पाठवून दिले. तशातच टीव्हीवर एक बातमी झळकली, 'या महाप्रलयात वाचलेली काही



*नितांत हळवे डोंगर आणि निवांत साऱ्या दिशा। संथ वाहत्या पाण्यालाही, मोहकतेची नशा।*



**जरूर पाहा : सालारजंग संग्रहालय,** हैदराबाद (निजामकालिन ऐतिहासिक दुर्मीळ वस्तू)

**प्रायोजक - सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्युस्टन, टेक्सास, अमेरिका**

बाळं ॲम्स्टरडॅम येथील अनाथाश्रमात ठेवली आहेत. त्यांची अजूनपर्यंत ओळख पटलेली नाही. त्यांचे नातेवाईक जिवंत असल्यास संपर्क साधावा.' एक महिन्याने पुन्हा बातमी आली की, त्यापैकी पाच बाळांना घेऊन जाण्यास कोणीही पालक आले नाहीत. बातमीच्या शेवटी देशवासीयांना या बाळांना दत्तक घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. हे ऐकून माला आणि जयनं त्या बालगृहात तातडीनं जाण्याचं ठरवलं.

दुसऱ्या दिवशी सकाळीच दोघेजण ॲम्स्टरडॅम येथील बालगृहात दाखल झाले. त्यांची सर्व माहिती घेऊन मग त्यांना बाळांच्या खोलीत नेण्यात आले. सर्व चिमुकले जीव पांघरुणात गुरफटून झोपी गेले होते.

शेवटच्या पाळण्यापाशी जातात तोच त्यातील बाळ जागे दिसले. निळ्या निळ्या डोळ्यांनी ते गोड बाळ या दोघांकडे टुकूटुकू बघत होते. जणू काही 'मला उचलून घ्या' असं ते म्हणतंय असं मालाला वाटलं. तेवढ्यात तेथे नर्स आली आणि तिने ते बाळ म्हणजे अंदाजे चार महिने वयाची मुलगी असल्याचं सांगितलं. तिच्या परवानगीनं मालानं त्या मुलीला उचलून घेतलं तर तिच्या चेहऱ्यावर हसू उमटलं. माला म्हणाली,

''जय, हेच बाळ आपण घ्यायचं. देवानंच त्याला आपल्याकडे पाठवलं आहे. बाळाला घेऊन सर्वजण ऑफिसमध्ये गेले. तिथे डॉक्टरही होते. त्यांनी सांगितले की, ही बालिका सुदृढ आहे, पण तिचे गुडघ्यापासून खालचे दोन्ही पाय जन्मत: एकमेकांना चिकटले आहेत. तिथे एक पातळ पडदा आहे. छोट्याशा शस्त्रक्रियेनं तो कापून पाय सुटे होतील. पुढे काहीच व्यंग राहणार नाही. तसंच पायाच्या बोटांमध्ये पण पातळ पडदा आहे. चिकटलेली बोटं सुटी करता येतील.

हे सर्व ऐकून जयचा चेहरा चिंतातुर झाला. त्याचा निर्णय होत नव्हता. पण माला मात्र हट्टाला पेटली होती. शेवटी तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी जयने होकार दिला. आणि नीरजाचे नवीन घरात आगमन झाले. योग्यवेळी तिचे पाय सुटे करण्याची शस्त्रक्रिया होऊन ती दुडूदुडू धावू लागली. जय आणि मालाचे आई-वडील भारतातून आले. दोघी आज्या नीरजाला बघून हरखून गेल्या.

तिसऱ्या वर्षी ती छोट्या शाळेत जायला लागली. शाळेत मुलांना डुंबायला छोटंसं तळं केलं होतं. त्यात खेळायला तिला खूप आवडायचं. अजय आणि मालानं तिला चौथ्या वर्षी पोहायला शिकवलं; आणि तिनं त्यात आश्चर्यकारक प्रगती केली. मग तिच्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षक नियुक्त केला. ती चारही *स्ट्रोक* लीलया शिकून स्पर्धेमध्ये उतरण्याच्या तयारीची झाली. पाण्यामध्ये सूर मारण्यात ती पटाईत होती.

वर्तमानपत्रातून तिचे नाव येऊ लागले. 'जलपरी' या नावानं लोक तिला कौतुकानं संबोधत असत. असं करता करता नीरजा सात-आठ वर्षांची झाली. ती नेहमी विचारायची;

''आई, माझं नाव 'नीरजा' का ठेवलं?'' आई म्हणायची,

''अगं, नीरजा म्हणजे पाण्यातलं कमळ ! तुला पाण्यावर तरंगायला खूप आवडतं ना?'' नीरजाची पोहण्याची आणि इतर प्रगती बघून माला आणि जयचा ऊर अभिमानाने भरून येई. एका स्पर्धेत नीरजाला 'हॅन्स अँडरसन'च्या परीकथांचा संच बक्षीस मिळाला. मग काय विचारायलाच नको. शाळा सुटल्यावर, पोहण्याचा सराव करून घरी आल्यावर नीरजा पुस्तक घेऊन घरामागच्या तळ्यावर जायची. तिथे एकटीच तासन्तास बसायची. अंधार पडल्यावर आई तिला स्वयंपाकघराच्या खिडकीतून हाक मारायची. मग नीरजा मागच्या अंगणातून घरात यायची. आई म्हणायची,

''अगं नीरजा, एकटीच काय करतेस इतका वेळ?''

नीरजा म्हणायची, '' एकटी नाही वाचत मी. माझी एक मैत्रीण



*कळसावरती हेमझळाळी खाली फुलांचा सडा। आशेच्या किरणांनी द्रवते हिरवी काळीज कडा।।*



**जरूर पाहा : सिटी संग्रहालय,** हैदराबाद, तेलंगणा (प्राचीन नाणी, निओलिथिक काळातील मडकी)

**प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड**



येते ना खेळायला. तिला मी वाचून दाखवते.'' कधी कधी मालानं स्वयंपाकघराच्या खिडकीतून बघितलं असता पाण्यात पाय सोडून बसलेली मुलगी दिसायची. एकदा माला म्हणाली, ''नीरजा, तुझ्या मैत्रिणीला घरी खेळायला यायला सांग ना. ती कुठे राहते, कोणत्या शाळेत जाते, सगळं विचारून घे.''

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी नीरजा घरी आल्यावर म्हणाली,

''अगं, माझी मैत्रीण म्हणाली मी तुझ्या घरी येणार नाही. इथे पाण्यात पाय सोडून बसायला मला आवडतं; आणि पुढे ती मला सांगत होती की, या तळ्यातील पाण्याखालून समुद्रापर्यंत जायचा रस्ता आहे. तिकडे समुद्राखाली ती राहते. ती मला सारखी घरी बोलावते. जाऊ का मी एकदा तिच्याबरोबर?'' हे सगळं ऐकून माला जराशी घाबरली. ती नीरजाला म्हणाली,

''कुठेही जायचं नाही. उद्याच मी तुझ्या मैत्रिणीला भेटणार आहे. सारखी परीकथांची पुस्तकं वाचून त्यातच तुम्ही रमता. भारतातून आणलेली शूर मुलांच्या गोष्टीची पुस्तकं जरा वाचत जा.''

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी माला नीरजाला एकटीला तळ्याकाठी जाऊ देत नव्हती. इतक्यात घराची बेल वाजली म्हणून माला दार उघडायला गेली आणि नीरजा घरातून सटकली. तिला रोज तिथे जाण्याची प्रबळ ओढ लागून राहायची. जरा वेळाने मालाने स्वयंपाकघरातून डोकावून बघितले तर तिला एकटीच नीरजा दिसली म्हणून माला तळ्याच्या रोखाने जाऊ लागली. जरा जवळ जाते न जाते तोच तिला कोणीतरी पाण्यात धपकन् उडी मारल्याचे जाणवले; पण दिसले मात्र कोणीच नाही. जरा नीट बघितले तर एक मोठा मासा दूर जात असताना दिसला, त्याची रुपेरी झळाळी मात्र डोळे दीपवणारी होती.

मालाने रागाने नीरजाला विचारले,

''कुठे आहे तुझी मैत्रीण? एकटीच वेड्यासारखी इथे बडबड



*गर्द झाडी हिरवी हिरवी किलबिल पाखरं गाणे। फुला फुलांचे धुंद ताटवे झुलती आनंदाने।।*



**जरूर पाहा : आसाम स्टेट संग्रहालय,** गुवाहाटी,आसाम (प्राचीन हत्यारे, शिल्प, लोककलाकृती)

**प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे**

करीत बसली आहेस. आता तुला मी इकडे येऊ देणार नाही.''

माला तिचा हात धरून ओढत घराकडे आणू लागली. नीरजा म्हणाली,

''अगं आई, माझी मैत्रीण होती तिथे. तिचं नाव जलजा. तुझ्यासमोरच तिनं पाण्यात उडी नाही का मारली?'' माला काहीशी घाबरली. तिला कोणीच दिसले नव्हते. दिसला होता तो दूरवर पोहत जाणारा रुपेरी झळझळीत माशाचा शेपटाकडील भाग, संध्याकाळी मालाने जयला काळजीयुक्त स्वरात सगळी घटना सांगितली. जय म्हणाला,

''अगं, मुलं स्वप्नांच्या दुनियेत रमतात. नीरजावर तिची आवडती गोष्ट 'लिटिल मरमेड' चा खूपच परिणाम झाला असेल. शिवाय शाळेच्या नाटकात पण तिला मत्सकन्या केले होते ना? त्याचाच हा परिणाम असणार !''

दुसऱ्या दिवशी नीरजा शाळेतून आली; पण तिने तळ्याकाठी जाण्याचा अजिबात हट्ट धरला नाही. रात्री झोपताना ती आईला म्हणाली,

''आई, जलजा मला शाळेच्या पोहण्याच्या तलावात भेटायला आली होती.'' पुढे मला म्हणाली,

''जय आणि माला तुझे खरे आईबाबा नाहीत. खरंच आहे का हे?'' माला तिच्या तोंडावर बोट ठेऊन म्हणाली,

''काहीतरी काय बोलतेस? तू तर आमच्या काळजाचा तुकडा आहेस,'' पुढे ती म्हणाली,

''मला जलजानं सांगितलं की, पाण्याखाली त्यांचं एक सुंदर जग आहे. तिथे माझे खरे आईबाबा राहतात. दहा वर्षांपूर्वी पाण्याखाली भूकंप झाला आणि मोठ्या लाटेबरोबर मी वर आले. माझे पाण्यातले आईबाबा माझी खूप वाट बघत आहेत. मी एकदा जाऊ का त्यांना भेटायला?''

माला घाबरून म्हणाली,

''कुठंही जायचं नाही. मी उद्याच शाळेत जाऊन *टीचरना* सांगते. म्हणजे त्या तुला तलावाजवळ जाऊच देणार नाहीत.'' नीरजा म्हणाली,

''आई, घाबरू नकोस गं. मी तुला सोडून कधीच जाणार नाही.'' मालाच्या गळ्यात हात टाकून नीरजा झोपी गेली. माला मात्र रात्रभर तळमळत होती. नीरजाला शाळेत समुपदेशकांकडे न्यायचं का? तिच्या मनात विचारांचं मोहोळ उठलं होतं.

मधले दोन-चार दिवस बरे गेले अन् एक दिवस अचानक नीरजा म्हणाली,

''आई मी नाहीशी झाले तर काय करशील गं?'' माला चरकली, म्हणाली,

''नाहीशी कशी होशील? आमचं तुझ्यावरचं प्रेम तुला परत आमच्याकडे घेऊन येईल.'' मालाला मिठी मारून नीरजा म्हणाली,

''आई, मी तुला कधीच विसरणार नाही.''

''वेडी आहेस झालं,'' म्हणून माला संध्याकाळच्या स्वयंपाकात गुंतली.

थोड्या वेळानं बघते तर नीरजा घरात तर नव्हतीच. तळ्यावर बघितलं तर तिथेही पत्ता नाही. माला सैरभैर होऊन नीरजाला हाका मारत फिरू लागली. शेजारी-पाजारी, रस्त्यावर सर्वत्र चौकशी केली. मैत्रिणींच्या घरी फोन करून झाले. जय पण तातडीने घरी आला. शेवटी रात्री दोघांनी पोलीस चौकीत जाऊन हरवल्याची तक्रार नोंदवली.

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात, टीव्हीवर नीरजाचे फोटो आले. सर्वत्र *पोस्टर्स* लावली गेली. पाणबुड्यांनी तळ्याचासुद्धा खोलवर शोध घेतला. मालाने नीरजाची मैत्रीण व त्यांचे बोलणे पोलिसांना सांगितले. पण त्यांना त्यात काहीच तथ्य वाटले नाही. सर्व हॉस्पिटलमधून आजूबाजूची गावे, शहरे, वस्त्या सर्वत्र शोध जारी होता. माला खचून गेली होती. जय तिला धीर देण्याचा प्रयत्न करत होता. नीरजाच्या शाळेतल्या मैत्रिणी गांगरून गेल्या होत्या. शिक्षक त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत होते. मालाची अवस्था बघवत नव्हती. तिला अन्नपाण्याची शुद्ध नव्हती. नीरजाचे कपडे, खेळणी, पुस्तके जवळ घेऊन तासन्तास ती बसून



*निसर्ग इथला मित्र जिवाचा, मला वाटतो खास। फुलाफुलांतून येतो, त्याच्या मैत्रीचा सुवास।।*



**जरूर पाहा : डोग्रा आर्ट संग्रहालय,** जम्मू (ऐतिहासिक व सांस्कृतिक वस्तू, डोग्रा पोशाख, हत्यारे, धातूच्या वस्तू)

**प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली**

राही. 'नीरजा कुठे असेल? काय खातपित असेल? तिला कोणी बळजबरीने पळवून नेले असेल का? नक्की त्या मैत्रिणीचेच हे काम आहे,' असे नाना विचार तिच्या मनात थैमान घालत. नीरजाची वाट बघत ती तळ्याकाठी बसून राही. पोलीस खात्याला हे मोठेच अपयश आले होते.

काही महिन्यांनी जयनं भारतात बदली करून घेण्याचे प्रयत्न सुरू केले. त्याची मागणी मान्य होऊन मुंबई ऑफिसला बदली झाली. आपली माणसं, वेगळं वातावरण, नवीन शहर यामुळे जय आणि माला दोघांच्या मन:स्थितीत बदल होणार होता. सामान आवराआवरीत काही दिवस गेले. घर सोडून जाण्याचा दिवस जवळ आला तशी मनाची हुरहूर वाढली. माला दिवसभर नीरजाचे फोटो बघत बसली होती. इतक्यात तिला नीरजा बोलत आहे असं वाटलं. तिने इकडेतिकडे चमकून पाहिलं तर कोणीच नव्हते. तशातच मालाला डुलकी लागली, तर स्वप्नात नीरजा सांगत होती,

''आई, माझी काळजी नको करूस. मी आनंदात आहे. इथे माझे आई-बाबा, मैत्रिणी सगळे आहेत. मी तुला कधीतरी भेटीनच. तुम्ही पण माझे लाडके आईबाबा आहात.''

माला खाडकन झोपेतून जागी झाली आणि स्वयंपाकघराची खिडकी उघडून नेहमीप्रमाणे तळ्याकडे बघू लागली तर तिथे चक्क नीरजा आणि तिची मैत्रीण तळ्यात पाय सोडून बसलेल्या होत्या. नीरजाने तिच्याकडे बघून हात हलवला. माला तिला बघून तळ्याकडे धावत सुटली. आता तिथे मैत्रीण दिसत नव्हती; एकटी नीरजाच होती. माला तिला हाका मारत येत होती. इतक्यात नीरजाने काठावरच्या उंचवट्यावरून पाण्यात जोरदार सूर मारला आणि मालाचे डोळे दिपून गेले. ती नेहमीची नीरजा नव्हतीच. माशाप्रमाणे सळसळणारं तिचं शरीर रुपेरी रंगानं झळाळत होतं. क्षणभर एखादी प्रखर ज्योत उंचावरून पाण्यात पडावी असं वाटलं. बघता बघता ती पाण्यात दिसेनाशी झाली. लांबवर तिचा झळाळता रंग काही क्षण दिसत होता. काही मिनिटातच माला भानावर आली आणि देवाला हात जोडून म्हणाली,

''देवा, जिथे असेल तिथे आमच्या नीरजाला सुखात ठेव!''

दुसरे दिवशीच जय आणि माला मुंबईला आले. माला नवीन वातावरणात रुळली. तिने इंटरनेटवरून *क्रिप्टोझुऑलॉजी* या विषयाची माहिती मिळवण्याची सुरुवात केली. त्यात तिला समजले की मत्स्यकन्या किंवा अनेक जलचरांच्या अस्तित्वाबद्दल शास्त्रज्ञांच्या शोधमोहिमा सुरू आहेत. तिने त्या विषयाला जणू वाहूनच घेतले. विद्यापीठाच्या ग्रंथालयात ती अभ्यासाला जाऊ लागली. पण आज पावसाची चिन्हं होती आणि मन जरा उदास होतं म्हणून ती गेली नव्हती. संध्याकाळी जय ऑफिसमधून येण्याची वेळ झाली. बाहेर पाऊस कोसळत होता.

इतक्यात घराची बेल वाजली. दार उघडताच जय हातातले कागद फडकवत आत आला. तो अतिशय आनंदात होता. त्याच्या हातात मालाचे डॉक्टरांचे रिपोर्ट होते. तो मालाला म्हणाला,

''अगं, आता तू खरीखुरी आई होणार आहेस.''

माला म्हणाली,

''ती तर मी दहा वर्षांपूर्वीच झाले होते.'' माला आनंदानं देवापुढे हात जोडून म्हणाली, ''तुझी लीला अगाध आहे. जेथे माझी नीरजा असेल तिथे तिला सुखात ठेव. माझी खात्री आहे ती मला मधूनमधून भेटायला येईलच. आम्हा आईबाबांना ती कधीच विसरणार नाही असं तिनं वचन दिलं आहे.''

आता पाऊस थांबला होता. सर्वत्र टवटवी आली होती आणि जय व माला आईवडिलांना फोन करून नवीन बातमी देण्याच्या आनंदात होते.

❀❀

**- नीलिमा करमरकर**
ब-शशिकिरण, अशोक पथ,
लॉ कॉलेज रस्ता, पुणे 411004

*असे असावे सुंदर खेडे सागर तीरावर। अन् माडांची दाट सावली डोंगर पाठीवर।।*

**जरूर पाहा : पाटणा संग्रहालय,** पाटणा, बिहार (नाणी, कलाकृती, चित्रे, छायाचित्रे, शिल्पे)

**प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५**

# भूकंप : एक विनाशकारी संकट



– डॉ. श्रीकांत कार्लेकर

**नेपाळमध्ये २५ एप्रिल २०१५ रोजी महाविनाशकारी भूकंप झाला. त्यानिमित्ताने भूकंप होण्याचं नेमकं कारण काय असतं? भूकंपप्रवण क्षेत्र कशाला म्हणतात? पृथ्वीवरील प्रमुख भू-तबके कोणती? या व अशा प्रश्नांची उत्तरे जाणून घेऊया सोबतच्या लेखातून...**

नेपाळमध्ये २५ एप्रिल २०१५ रोजी महाविनाशकारी भूकंप झाला. त्यात फार मोठी जीवित व वित्तहानी झाली. या संकटातून सावरेपर्यंत १२ मे २०१५ ला पुन्हा जवळजवळ तितक्याच तीव्रतेचा भूकंप झाला. दोन्ही भूकंपांचे धक्के भारतात बिहार, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल यांमध्येही जाणवले.

सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींपैकी भूकंपाची आपत्ती ही अतिशय संहारक आपत्ती आहे. मात्र, आपल्याला अजूनही या विनाशकारी संकटाचे भाकीत करणे जमलेले नाही.

भूकंप का, कसे व कुठे होतात याबद्दल शास्त्रज्ञांनी आतापर्यंत खूपच अचूक ज्ञान मिळविले आहे. भूकंपाच्या तीव्रतेबद्दलही खूप संशोधन झालेले आहे. भूकंपाची संभाव्य क्षेत्रेही आता नेमकेपणाने सांगणे शक्य झालेले आहे. असे जरी असले, तरी एखाद्या भूकंपप्रवण क्षेत्रांत नेमका कधी भूकंप होईल याचे पूर्वानुमान करणे अजूनही शक्य झालेले नाही.

**पृथ्वीच्या अंतरंगातील प्रस्तर पट्ट्यांची अनिश्चित हालचाल हा या सगळ्या भूवैज्ञानिक प्रक्रियेतला महत्त्वाचा घटक.** काही शास्त्रज्ञांच्या मते पृथ्वीवर पूर्वी जेवढे भूकंप आणि ज्वालामुखीचे उद्रेक होत असत त्यापेक्षा आज त्यांची संख्या खूपच कमी झाली आहे. मात्र, पूर्वीपेक्षा आज एखाद्या लहानशा धक्क्यानेही होणारे हानीचे प्रमाण खूपच वाढले आहे. याचे मुख्य कारण असे, की भूकंप प्रक्रियेनंतर दाट वसाहतींच्या प्रदेशात जी पडझड होते, इमारती पडतात, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होते. जगभर, विशेषत: भूकंपप्रवण प्रदेशात सर्वत्र वाढणारी लोकसंख्या, इमारतींची बांधकामे, दाटीवाटीने राहाणारी मनुष्यवस्ती हेच खरे म्हणजे भूकंपामुळे होणाऱ्या विनाशाचे मुख्य कारण आहे.

***प्लेट टेक्टॉनिक्स*** **किंवा 'भू-तबक विवर्तनी'** हे आज भूकंप निर्मितीचे सबळ कारण मानण्यात येते. जगातील भूकंपांची ठिकाणे पाहता, भूकंपांचा आणि पृथ्वीवरील भू-तबकांचा व त्यांच्या हालचालींचा अगदी जवळचा संबंध आहे असे लक्षात येते.

पृथ्वीचे कवच **सियाल** आणि **सीमा** या दोन मुख्य थरांनी बनले आहे. त्याखाली अंतरंगात **प्रावरण** हा विभाग आहे. **भू-तबके** ही प्रामुख्याने सियाल व सीमा या थरात असून त्यांची जाडी १०० ते १५० किलोमीटर आहे. भू-तबके **खंडीय *(काँटीनेंटल)* व सामुद्रीक *(ओशियानिक)*** अशा दोन प्रकारची असतात. सियाल व सीमा थरांच्या खालचा भाग म्हणजे 'मोहो'ची विलगता. हा प्रदेश खंडाच्या हालचालीस योग्य नसून, त्याखाली असलेला *ॲस्थनोस्फिअर* हा न्यूनतम प्रवेग थर तबकांच्या हालचालींकरता आदर्श असल्याचे दिसून येते. भू-तबकांची जाडी या थरापर्यंत असते.

पृथ्वीची विभागणी अशाप्रकारच्या सहा मोठ्या व अनेक लहान तबकांत झाल्याचे दिसून येते. ही सर्व तबके घट्ट खडकांनी बनली असून ती विविध आकारांची व असमान आहेत. प्रत्येक तबकाला त्याचा स्वत:चा 'यूलर पोल' नावाचा ध्रुव प्रदेश असून त्याभोवती त्याची हालचाल 'यूलर थिअरम' प्रमाणे होत असते. तबकांच्या या हालचालीमुळे, त्यांच्या कडा, एकमेकींना विरोध करीत, एकमेकांना घासत असतात किंवा खालीवर होत असतात. अशा ठिकाणी नेहमीच भूप्रक्षोभक हालचाली घडत असल्यामुळे भूकंप होऊ शकतात. पृथ्वीवरील सगळे खंड आणि महासागर भू-तबकावर स्थिरावलेले आहेत. त्यामुळे ही तबके सरकू लागली की त्यावरील




*विशाल घळणी, उन्नत सुळके, रेखीव पाऊलवाटा। रेतीवरती खेळ मांडती, निळ्या सागरी लाटा।।*



**जरूर पाहा : उज्जयंत महाल**, आगरताळा, त्रिपुरा (मुघल बागा, संगीतविषयक माहिती, ग्रंथालय)

**प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे**




**पृथ्वीवरील प्रमुख भू-तबके**

भूमीखंडेही आपोआपच सरकतात.

पृथ्वीवर युरेशिआ व आजूबाजूचे समुद्र, आफ्रिका व पूर्व अटलांटिक सागरतळ, भारत-ऑस्ट्रेलिया-न्यूझिलंड, प्रशांत महासागर तळ, अमेरिका व पश्चिम अटलांटिक सागरतळ आणि अंटार्क्टिका व आजूबाजूचा समुद्र अशी सहा मुख्य भू-तबके आहे. जी अनेक लहान भू-तबके पृथ्वीवर आहेत त्यात फूजी, कॅरोलिन, अरेबियन, फिलिपिन्स, कोकोज व नाझका ही महत्त्वाची तबके आहेत. जगातील ज्वालामुखी प्रदेश आणि भूकंप प्रदेश या लहान-मोठ्या भू-तबकांच्या सीमावर्ती भागात आढळून येतात.

**संहारक व संधारक** स्वरूपाच्या त्याच्या सीमांवरून ही तबके निश्चित करण्यात आली आहेत. भूकंप जेव्हा समकक्ष घसर (Strike Slip) स्वरूपाचा असतो तेव्हा तो संहारक नसतो. अशा प्रकारात भू-तबके (plates) एकमेकांना घासून समकक्ष (Horizontal) दिशेनं सरकतात. महत्त्वाची गोष्ट अशी की तबकांची ही हालचाल तबकाच्या मध्यवर्ती भागात निर्माण झालेल्या भ्रंश रेषेवर घडते. याला आंतरतबकीय (Intra Plate) भूकंप म्हटलं जातं. तबकातील भ्रंश, भेगा, विभंग यावरून त्यांची भूकंपप्रवणता ठरविली जाते. अशा भूकंपाची तीव्रता कधीही सहा रिश्टरपेक्षा अधिक नसते. महाराष्ट्रात पनवेल, चिपळूण या भागातून जाणाऱ्या भ्रंशभेगावरून भूकंपप्रवण प्रदेश ठरवलले आहेत.

दोन तबकांच्या सीमावर्ती भागात जिथे अधोगामी क्रिया घडते (Subduction Zone) व एक तबक दुसऱ्या तबकाखाली घसरते. तिथला भूकंप नेहमीच मोठ्या तीव्रतेचा असतो. आत्ताचे नेपाळमधले भूकंप या प्रकारचे आहेत. आज जिथे हिमालय आहे, त्या भागात युरेशिअन भू-तबक व भारतीय भू-तबक यातील कड किंवा सीमावर्ती प्रदेश आहे. जेव्हा जेव्हा भारतीय भू-तबक युरेशिअन भू-तबकास उत्तरेकडे वा ईशान्येकडे ढकलते तेव्हा-तेव्हा हिमालयात व त्याच्या आजूबाजूच्या विस्तृत भूपृष्ठाला हादरे बसून भूकंप होतात. नुकत्याच नेपाळमध्ये झालेल्या भूकंपामागचे मुख्य कारणही हेच आहे.


१९६७ मध्ये मेकेंझी व पार्कर या शास्त्रज्ञांनी भू-तबकांच्या हालचालीचा सिद्धांत मांडला. मात्र, तबकांच्या या हालचाली नेमक्या कशामुळे होतात याचे समाधानकारक उत्तर अजूनही सापडलेले नाही.

काही कोटी वर्षांपूर्वी भारताचा भूभाग दक्षिण गोलार्धात

*हे जगणे व्हावे सखोल सुंदर खूप। दरवळतो आहे श्वासांमधुनि धूप।।*

जरूर पाहा : संघोल संग्रहालय, फतेहगड साहिब, पंजाब (प्राचीन बांधकाम, स्तूप इ.)

**प्रायोजक - चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे**




हिमालयाची निर्मिती

होता. गोंडवनभूमीचा तो भाग होता. उत्तरेकडचा लॉरेशिआ खंडाचा भाग व गोंडवनभूमी यामध्ये अरुंद टेथिस समुद्राचा भाग होता. दक्षिणेकडचे भूखंड उत्तरेकडं सरकल्यामुळं खचत असलेल्या टेथिस भूद्रोणीतस्तरित खडक भरडले जाऊन ताण व दाब यामुळं 'प्रस्तरभंग' आणि 'वलीकरण' क्रियांची सुरुवात झाली. सुमारे दहा हजार मीटर जाडीचे खडक या हालचालीत भरडले गेले. हिमालयाची ही निर्मिती सुमारे ७० लाख वर्षे चालू असावी. एक कोटी ते दहा लाख वर्षांपूर्वी टेथिसचा पूर्ण लोप झाला असावा. हिमालय निर्मितीच्या हालचालींमुळे हिमालयाचं शिवलिक किंवा बाह्य हिमालय, मुख्य किंवा मध्य हिमालय आणि हिमाद्री म्हणजे सर्वोच्च उंचीची पर्वतरांग तयार झाली. भारताच्या उत्तरेकडे झालेल्या हालचालीमुळे व दोन्ही खंडातील दाबामुळे टेथिस समुद्रात गाळ संचयन होऊन व टेथिसची द्रोणी वर उचलली गेल्यामुळे हिमालयाची निर्मिती झाली. आजही दरवर्षी ४० ते ५० मिमि. या वेगाने भारतीय तबक उत्तरेकडे सरकते आहे आणि ते युरेशिअन तबकाखाली जाताना प्रक्षोभक हालचालींमुळे विनाशकारी भूकंप घडवून आणतच आहे.

खरे म्हणजे वर सांगितल्याप्रमाणे हिमालयाची निर्मिती हीच मुळात भारताची उत्तरेकडे झालेली हालचाल व ५ ते ६ कोटी वर्षांपूर्वी तिची युरेशिअन तबकाशी झालेली टक्कर याचाच परिणाम आहे. या दोन्ही तबकांच्या दरम्यान जो विभंग प्रदेश आहे, त्याच्या दक्षिणेकडचा प्रदेश, हिमालयातला मुख्य भूकंपप्रवण प्रदेश आहे. १९०५ चा कांगडा खोऱ्यातील भूकंप, १९३४ चा बिहारचा भूकंप, १९५०, १९८८ मधील आसाम भूकंप, १९९१ चा उत्तर काशीचा आणि आता २०१५ मधला नेपाळमधील भूकंप हे सगळे विनाशकारी भूकंप याच भागात घडले.

भूकंपाची निर्मिती ही पृथ्वीच्या अंतरंगात खूप खोलवर होते. पृथ्वीवर काही मीटर खोलीपर्यंत परिणाम घडवून आणणाऱ्या घटना, संहारक भूकंपास कारणीभूत ठरतील याची शक्यता खूपच कमी असते. त्यामुळे धरणे बांधल्यामुळे, जलाशय निर्मितीमुळे भूकंपाची शक्यता वाढते हे विधान तितकेसे योग्य नाही.

भूकंपाचा अंदाज करता येत नसला, तरी भारतासाठी भूकंपप्रवणतेचा नकाशा तयार करणे, त्या प्रदेशातील बांधकामे भूकंपरोधक बनविणे आणि त्यांची पुनर्रचना करण्याला पर्याय नाही. मुख्य म्हणजे या नैसर्गिक संकटांची नेमकी माहिती देऊन जनजागृती करणे आणि भूकंपाच्या आपत्तीमध्ये कशी व कोणती काळजी घ्यावी याबद्दल लोकजागृती करणे असे उपाय नक्कीच फायदेशीर ठरतात.

❁❁

**– डॉ. श्रीकांत कार्लेकर**
४७ अंकुर, सहनिवास, ५७३/४ बिबवेवाडी, पुणे 411037



*दृष्टीला पडते नवस्वप्नांची भूल। सत्यात उमलते चैतन्याचे फूल।।*

**जरूर पाहा : संगमरवरी महाल,** कोलकता, पश्चिम बंगाल (पाश्चिमात्य शिल्पे, युरोपियन चित्रे)

**प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे**

# निसर्गसंपन्न बांधवगड

**– सुजाता लेले**

**मित्रांनो, नैसर्गिक वातावरणात मुक्तपणे वावरणारे प्राणी–पक्षी नि हिरवा निसर्ग यांच्याशी दोस्ती करायची असेल, तर थोडासा वेळ काढून जंगल सफारीला जायलाच हवं. निसर्गाची साद ऐकायला आणि निसर्गाशी एकरूप होण्यासाठी गेलेल्या लेखिकेचे बांधवगडचे अनुभव वाचूया...**



'गरीब रथ' या रेल्वेतून प्रवास करत सकाळी सहा वाजता आमचा गट जबलपूरला पोचला. तिथून 'भेडाघाट' ला गेलो. नर्मदा नदीचे 'रौद्र रूप' बघून फक्त 'आ' वासला. पाण्याचा आवाज, तिथूनच उडणारे छोटे छोटे पक्षी, खडकावरून खाली येताना धबधब्याप्रमाणे दिसणारी 'नर्मदा', त्यातले तुषार अंगावर झेलणारे व त्यामुळे तृप्त होणारे आम्ही! अजून काय हवे होते? हे सर्व साधायला 'कॅमेरा' बंद केला अन् फक्त डोळ्यांनी तो 'निसर्ग' साठवू लागलो.

मग दुपारी साधारण ३ वाजता आम्ही *मान्सून फॉरेस्ट रिसॉर्टला* पोचलो. त्याठिकाणी जाता-जाता एका पाणवठ्यावर असलेल्या एका झाडावर *इंडियन ईगल आउल* (घुबड) दिसले. तर दुसऱ्या झाडावर ब्राऊन फिरा *आउल* (घुबड) दिसले. ही दोन्ही घुबडे झाडाच्या खोडांच्या रंगांमध्ये इतकी मिसळून गेली होती की, ती फक्त आमच्या *गाईड* मित्रालाच दिसली. त्यानें आम्हाला दुर्बिणीतून बघायला सांगितले; पण त्यांना दुर्बिणीतून शोधणेसुद्धा 'अवघड' होते. थोड्या प्रयत्नांनंतर जेव्हा जेव्हा ती दिसली, तेव्हाचा आमच्या चेहऱ्यावरचा 'आनंद' टिपायला हवा होता असं क्षणभर वाटून गेलं. या दोन झाडांमध्ये एक जरासे उंच झाड होते. तिथल्या खालच्या जागेत रंगानं पांढऱ्या व पिवळ्या चोचीच्या गिधाडानं घरटं केलं होतं. दोन घुबडे जवळच असल्याने गिधाडाची मादी तिच्या पिल्लांसोबत होती.

दुपारी तीन वाजता *रिसॉर्टला* पोचल्यामुळे त्यादिवशी सफारीला जाता आले नाही; पण *फॉरेस्ट रिसॉर्ट* असल्याने, तिथेच बाहेर जंगलाच्या आवारात आम्ही चालत चक्कर मारली. आमच्याबरोबर *रिसॉर्टमधील* माहितगारपण होता. कारण संध्याकाळी जवळपासच्या भटक्या कुत्र्यांची शिकार करायला 'बिबट्या' येऊ शकतो. तिथल्या झाडांवर इंडियन रोलर, तांबट, होला, पावशा, रानचिमणी, सुतार, फुलटोच्या, दयाळ, चंडोल, सूर्यपक्षी, धोबी व टिटवी असे पक्षी दिसले. आमच्या खोल्यांमधून पण या पक्ष्यांचे दर्शन होत होतेच. इथून दिसलेले सूर्यास्ताचे दृश्य तर लाजवाब!

दुसऱ्या दिवशी पहाटे ६ वाजता जंगल सफारीला निघालो. बांधवगडच्या जंगलामध्ये साल व बांबूची झाडे आहेत. ही झाडे वाघांच्या वास्तव्यासाठी उपयुक्त असतात. आम्ही मगधी *झोनमध्ये* गेलो होतो. जंगलामध्ये जायचे *झोन* असतात. ठरावीक *झोनमध्ये* फिरायची वेळ असते. प्रत्येक वेळी परवानगी घ्यावी लागते. त्यादिवशी आम्हाला मोर, थापणी (जमिनीवरचा पक्षी) रानकोंबडे, वेडा राघू, सातभाई हे पक्षी दिसले तर पुढे गेल्यावर आठ महिन्यांची वाघाची पिल्ले पहुडलेली बघितली. (ती 'पिल्ले' होती, हे आमच्या गाईडने सांगितल्यावर कळले, आम्हाला तर ते वाघच वाटले...) त्यांची आई शिकार करायला गेली होती. आम्ही पिल्लांचे निरीक्षण करत असताना कंटाळलेली ही पिल्ले अचानक उठली अन् आवाज न करता दंगा करू लागली. इतर नर वाघांपासून संरक्षण व्हावे यासाठी ती पिल्ले आवाज करत नव्हती. वरील गोष्टीचे साधर्म्य माणसामध्ये सुद्धा काही वेळा आढळते. आपल्याकडेही मुलांना पळवून



**जरूर पाहा : जोशी म्युझियम ऑफ मिनिएचर रेल्वे**, पुणे, महाराष्ट्र (रेल्वेच्या विविध प्रतिकृती)

**प्रायोजक - श्री. राहुल भिडे, पुणे**





ठार केले जाते. म्हणूनच अशा दुष्ट प्रवृत्तीच्या माणसांना 'पशु' म्हटले जाते. असो. कोणताही प्राणी दिसला तरी जास्त वेळ थांबायचे नाही असा इथला नियम आहे, त्यामुळे आम्ही पुढे निघालो. त्यावेळी रानडुकरे, सांबर, हरणांचे कळप दिसले. सुंदर सुंदर फुलपाखरे दिसली. जंगलात जायची वेळ सकाळी साडेसहा ते दहा व दुपारी साडेतीन ते साडेसहा. त्यादिवशी जाता जाता एक वाघीण पाण्यात डुंबताना बघितली; पण वेळेचे बंधन पाळणे आवश्यक होते. त्यामुळे पाय निघत नसताना सुद्धा जावे लागले. दुपारी मात्र त्याच ठिकाणी पाण्यात दुसरी वाघीण बसली होती. तिथून थोडं दूर एक वाघ लोळत पडला होता. मग थोड्या वेळाने उठला आणि आमच्यावर गुरगुरत तो वाघ पाण्यात बसला. थोड्या वेळाने उठून झाडीत निघून गेला. वाघीण धीट असते. आमच्या ६-७ गाड्या होत्या तरी ती मस्तपैकी पाण्यात बसली होती. येताना त्याच पाण्यात एक मोर व दोन लांडोरी दिसल्या... मोराने पिसारा फुलवला अन् तो लांडोरीसमोर नाचत होता. पिसारा फुलवला की पाऊस पडतो असे म्हणतात, तसेच झाले.

जंगलामध्ये अचानक 'वादळ' सुरू झाले. झाडांची शुष्क पाने हवेत उडू लागली. वाळलेल्या पानांचा खच पडला होता. पाच वाजेपर्यंत आम्हाला कल्पना पण नव्हती! अचानक हवेत बदल झाला. आम्हाला तर डोळेसुद्धा उघडता येत नव्हते. खूप अंधारून आले. *रिसॉर्टमध्ये* पोहोचताच 'पाऊस' सुरू झाला. जंगलातल्या 'सुंदर हवेचा' अनुभव काही वेगळाच! *रूमवर* जाताना माझ्या मिस्टरांच्या पायाखाली काहीतरी वळवळताना दिसलं तर तिथे धामण होती. क्षणभर खूप भीती वाटली. *रूमची* दारे लगेच लावायची असतात ती येवढ्यासाठी. सरपटणाऱ्या प्राण्यांबरोबर वानरे-माकडेपण आत येऊ शकतात.

दुसऱ्या दिवशी 'ताला *झोन'* मध्ये निघालो. या झोनमध्ये निसर्गाची शांतता अनुभवली. साल, तेंदू, पळस, महुआ, बेहडा, बेल अशा वृक्षांचे, त्यांच्या फुलांचे सुवास- ज्यांच्यापुढे *परफ्यूम्स,* अत्तरेसुद्धा फिकी पडतील असे दरवळत होते. तर आवळा, उंबर, काटेसावर, कुसुम, देवकर्णी, राक्षस वेल हे पण वृक्ष होते. त्याच *झोनमध्ये* बांधवगडावर विष्णूच्या अवताराचे मंदिर आहे. पाच पांडवाचे म्हणजे पाच बांधवांचे अस्तित्व तिथे होते. म्हणून नाव पडले बांधवगड! जंगलामध्ये आम्ही शेषशायी विष्णूची भलीमोठी मूर्ती बघितली. शेजारीच शंकराची पण मोठी पिंड होती. बाकी एकदम शांतता... कधीतरी पक्ष्यांचे कूजन.. फुलांचे सुगंध... असे वाटत होते की निसर्ग जणू अंगाई गीत गात आहे. कारण थोडीशी 'पेंग' येईल इतकी शांतता होती. संध्याकाळी त्याच *झोनमध्ये* सकाळचा प्रसन्न निसर्ग मात्र संध्याकाळी चिडीचूप झाला होता. एक भयाण शांतता पसरली होती आणि त्याचवेळी 'गौर' प्राणी बघितले. सोबत त्यांची चार-पाच पिल्ले होती. त्यातल्या एकाने भयाण सूर लावला... आमच्या गाडीच्या खूप जवळ 'गौर' (गौर म्हणजे भलीमोठी जंगली गाय) होते. त्यांचे बघणेसुद्धा भीती वाटेल असेच होते. (आमच्या *रिसॉर्टमध्ये*



*हा सूर्य उगवतो, तरीही पणती जळते। चिमुकल्या प्रदेशी, प्रकाश देऊन न्हाते।।*

**जरूर पाहा : श्री. छत्रपती शाहू संग्रहालय,** कोल्हापूर, महाराष्ट्र (शाहू महाराजांच्या विविध वस्तुंचे प्रदर्शन)

**प्रायोजक - प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे**

माधुरीलता नावाचा अप्रतिम सुगंधाच्या फुलांनी भरलेला वेल होता. तिथून जावेसेच वाटत नव्हते.)

तिसऱ्या दिवशी 'मगधी *झोन*' मध्ये पुन्हा सकाळी सफारीवर गेलो. कारण पुन्हा जबलपूरला 'गरीब रथ' ही रेल्वे गाठायची होती. बांधवगड ते जबलपूर हा साडेतीन ते चार तासांचा प्रवास आहे. त्यामुळे आमच्याजवळ सकाळचाच वेळ होता. आम्हाला पहिल्या दिवशीची पिल्ले व वाघीण, हरणाची केलेली शिकार खात असताना दिसले. पण नंतर कुठेच काहीही दिसले नाही. इथे शेवटी कशाचीच शाश्वती नसते.

ही भटकंती करत असताना खंत सतत एकाच गोष्टीची वाटत होती – भेडाघाटाला लोकांनी प्लॅस्टिक बाटल्या, लेजची रिकामी पाकिटे, गुटख्याची पाकिटे पाण्यात टाकलेली होती. प्लॅस्टिक कचरा जिकडे तिकडे दिसत होता. याची दखल वेळीच घेतली पाहिजे. बाकी बांधवगड मात्र अप्रतिम! तिथला निसर्ग आपल्याला भरभरून देत आहे ते क्षण आपल्या डोळ्यांनी किती वेचू... अन् काय वेचू? असेच होऊन जाते.

प्राणी-पक्ष्यांना एकत्र बांधून ठेवणारा हा बांधवगड एकदा तरी जरूर अनुभवा! त्यासाठी कॅमेरा व दुर्बीण नक्कीच जवळ हवी!

❁❁

**– सुजाता लेले**
३२४ शनिवार पेठ, नंद कॉंपोझिटस्, पुणे 411030

## किस्से थोरामोठ्यांचे....

• गाढे विद्वान पंडित श्री. अहिताग्नी राजवाडे आपल्या घराच्या प्रांगणात 'शारदीय ज्ञानसत्र' नावाने व्याख्यानमाला आयोजित करीत असत. प्रत्येक वर्षी एखादा नवीन विषय निवडून त्यावर अनेक विचारवंतांची भाषणे होत असत. यासाठी राजवाड्यांचा एक दंडक होता तो असा की, 'सभेसाठी येणाऱ्या सर्वांनी डोक्यावर टोपी घातली असली पाहिजे.' एका वर्षीच्या ज्ञानसत्रात आचार्य अत्र्यांचे व्याख्यान आयोजिले होते. व्याख्यान देण्यासाठी अत्रे आले तेव्हा त्यांच्या डोक्यावर टोपी नव्हती. अत्रे तसे कुणाला फारसे न जुमानणारे, तर राजवाडेही परखड स्वभावाचे!! तेव्हा आता काय होणार याची प्रेक्षकांना काळजी वाटू लागली. अत्रे तसेच व्याख्यान द्यायला उभे राहिले. पण भाषण सुरू होण्याआधी आपल्या कोटाच्या आतल्या खिशात ठेवलेली टोपी त्यांनी गंभीर चेहऱ्याने काढून डोक्यावर घातली आणि मिस्किलपणाने हसून म्हणाले, ''मी आजवर अनेकांना टोप्या घातल्या. परंतु मला टोपी घालणारे अहिताग्नी राजवाडे पहिलेच आहेत!''

• सुप्रसिद्ध ब्रिटीश नाटककार लॉर्ड बर्नार्ड शॉ यांनी एका फोटोग्राफरकडून एकदा आपले काही फोटो काढून घेतले. त्या सर्व फोटोंचे एकंदर बिल दोनशे पाड झाले. तेव्हा बर्नार्ड शॉने त्या फोटोग्राफरला दहा दहा पाडांचे असे वीस चेक सही करून दिले. फोटोग्राफर ते बघून जरा गोंधळात पडला. त्याने विचारले, ''साहेब, दोनशे पाडांचा एकच चेक मला द्यावयाच्या ऐवजी हे दहा दहा पाडाचे वीस चेक आपण मला काय म्हणून दिलेत.?'' तेव्हा शॉ हसून त्याला म्हणाले, ''हे तुझ्या एकदम लक्षात यावयाचे नाही. पण मी तुला खचित सांगतो की, त्यामुळे तुमचा आणि माझा असा दोघांचाही चांगला फायदा झाल्यावाचून राहणार नाही!''

तरीदेखील शॉ काय म्हणतात ते फोटोग्राफरच्या लक्षात येऊ शकले नाही. तेव्हा हसतच शॉ पुढे म्हणाले, ''त्याचे असे आहे, आज माझ्या स्वाक्षरीचा भाव आहे पंचवीस पाड, म्हणजे मी दिलेले दहा दहा पाडाचे वीस चेक तुम्हाला बाजारात प्रत्येकी वीस पाड या दराने विकून एकंदरीत तीनशे पाड फायदा मिळविता येईल ! आणि जी-जी माणसे तुमच्याकडून माझे हे चेक विकत घेतील, ती-ती माणसे माझ्या स्वाक्षरीसाठी हे चेक स्वत:जवळ जपून ठेवतील, बँकेत जाऊन ते वटविण्याच्या भानगडीत पडणार नाहीत. म्हणजे मग माझाही दोनशे पाडांचा फायदा होणारच की नाही.'' हे ऐकून तो फोटोग्राफर मोठ्या आनंदाने निघून गेला.



*शाळा आमची अशी, हे सरस्वतीचे देऊळ। जाऊ इथून मी कसा? कसे उचलू पाऊल?*



**जरूर पाहा : झाँसी संग्रहालय,** झाशी, उत्तरप्रदेश (झाशीच्या राणीने वापरलेली शस्त्रास्त्रे आणि दस्तऐवज)

**प्रायोजक – कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे**



# डोंगर

डोंगर,
उभा एकटाच
पार गावाबाहेर
रणरण ऊन
माथ्यावर!

डोंगर,
असतो मौनात
कायम विचारात
आत्ममग्न होऊन
स्वत:शी संवाद साधत!

डोंगर,
झेलून पाऊसधारा
सोसतो सृजनवेणा
संकट काळातही
ठेवी ताठ कणा!

डोंगर,
अंगाखांद्यावरी
झाडाझुडपांचे प्रस्थ
राही स्थितप्रज्ञ
जणू जोगी समाधिस्थ।

डोंगर,
वैश्विक परिवाराचा
दिमाखदार हिस्सा
उमटवी अस्तित्वावर
स्वतंत्र ठसा।

**– मुबारक शेख**
**१६२/८ ब आळंदकर चाळ,**
**रेल्वे लाईन, सोलापूर ४१३००१**




*आम्ही पुढे पुढे जाऊ, आहे दिलेली शिदोरी। हात पाठीवर ठेवा उंच मारण्या भरारी।।*



**जरूर पाहा : वॅटसन म्युझियम,** राजकोट, गुजरात. (नाणी, चित्रे, हस्तकला, विविध वाद्ये, लाकडावरील नक्षीकाम)

**प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे**



# माझे संकल्प

## शालेय वर्ष

**चला ठरवून काही करूया!**

पुस्तकी अभ्यासाबरोबरच विविध अनुभव-कृतींमधून आपण खऱ्या अर्थाने 'मोठ्ठे' होत असतो. यासाठीचे संकल्प दुसऱ्या कोणीतरी आपल्यासाठी ठरवण्यापेक्षा, आपणच स्वत:हून ठरवले, तर ते पूर्ण होण्याची शक्यता अधिक! व त्यातला आनंदही मोठ्ठा!

तुम्ही कोणते संकल्प करायचे याबाबत तुम्हाला मदत करण्यासाठी शेजारील तक्त्यात विविध शीर्षके दिली आहेत. त्या प्रत्येकातला किमान १ आणि शक्य झाल्यास २-३ संकल्प तुम्ही लिहावेत. ते ठरविण्यासाठी अनेकांची मदत घ्यावी. संकल्प लिहून हा कागद मासिकातून काढा व तो एका जाड पुठ्ठ्यावर चिकटवा. हा तक्ता तुमच्या अभ्यासाच्या ठिकाणी नीट लावून ठेवा. वेळोवेळी विशेष नोंदी करत राहा. १५ जुलैपर्यंत तुम्ही तयार केलेल्या तक्त्याचा 'फोटो' किंवा 'झेरॉक्स' ई-मेलने वा पोस्टाने तुमचा नाव,पत्ता, दूरभाषसह आम्हाला पाठवा. आम्ही तुम्हाला तुमचे संकल्प पूर्ण होण्यासाठी नक्कीच मदत करू!





**छंदांची जोपासना**

१ ______________________

२ ______________________

३ ______________________




**पर्यावरणपूरक कृती**

१ ______________________

२ ______________________

३ ______________________




**स्पर्धांमधला सहभाग**

१ ______________________

२ ______________________

३ ______________________




**घरकामाची जबाबदारी**

१ ______________________

२ ______________________

३ ______________________




**उणिवांवर मात**

१ ______________________

२ ______________________

३ ______________________



**कलाकौशल्यातून नवनिर्मिती**

१ ______________________

२ ______________________

३ ______________________

*प्रकाशाचे गाणे गात केला सुदूर प्रवास। सांदी कोपऱ्यात केली प्रेम सेवेची आरास।।*

**जरूर पाहा : विशाखा संग्रहालय,** विशाखापट्टणम्, आंधप्रदेश (प्राचीन शस्त्रागार, मातीची भांडी, नाणी, शिलालेख)

**प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. २५३८०४०६), पुणे**

**घेऊन नव संकल्प मनी, झेलू नव आव्हाने।**
**थोरांचे आदर्श घेऊनी, पुढेच मजला जाणे ।।**





**ध्यास अवांतर वाचनाचा !**

१ ______________________
२ ______________________
३ ______________________



**इतरांच्या उपयोगी कृती**

१ ______________________
२ ______________________
३ ______________________



**धम्माल, नवीन अनुभव**

१ ______________________
२ ______________________
३ ______________________



**संकल्प व्यायामाचे**

१ ______________________
२ ______________________
३ ______________________



**थोरांच्या मुलाखती**

१ ______________________
२ ______________________
३ ______________________



**कृतीतून स्वावलंबन**

१ ______________________
२ ______________________
३ ______________________



**विशेष नोंदी**

* प्रवास, भटकंती - . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . .

* ठसा उमटवणाऱ्या व्यक्ती - . .

. . . . . . . . . . . . . . . . . . .

(पूर्व प्रसिद्धी : सौर ज्येष्ठ शके १९३५/जून २०१३)

*चेतवा रे नवा दिस जगा, जगू द्या। जागवा दिल्या-घेतल्या श्रमांची सहजाणीव मिरवा।।*

**जरूर पाहा : गोवा विज्ञान केंद्र,** पणजी, गोवा (डिजिटल तारांगण, ३ डी फिल्म शो, विज्ञान चित्रपटाचा खेळ इ.)

**प्रायोजक - सौ. रंजना सतीश कुलकर्णी, सातारा**

बौद्धिक खेळ

## बोलू लागले रंग

**उद्देश –** बहुदिश विचार, समानुभूती क्षमतेस वाव देण्यासाठी.

**साहित्य –** कोरे कागद, लिहिण्याचे साहित्य, रंगांची नावे लिहिलेल्या चिठ्ठ्या (लाल, पांढरा, हिरवा, पिवळा, निळा, काळा इ.), चिठ्ठ्यांची तयारी आधी करून घ्यावी.

**सूचना –** हा खेळ खेळण्यासाठी तीन जोड्या असाव्यात. सर्वांना कोरे कागद वाटा. रंगांच्या नावांच्या चिठ्ठ्या गटात घ्या. गोलात बसून एकाने सावकाश खालील सूचना द्या.

'मुलांनो, तुम्ही शाळेत- किल्ला बोलू लागला तर... असा निबंध लिहिला असेलच. त्यावेळी तुम्ही किल्ल्याच्या भूमिकेत जाऊन आपण किल्ला आहोत, अशी कल्पना केली असेल (समानुभूती) आणि मग तुम्ही किल्ल्याबद्दल लिहिलेत तसेच या खेळात करायचे आहे.'

आता चिठ्ठीतील रंग बघून काळा-पांढरा, लाल-हिरवा, पिवळा-निळा अशा रंगांच्या जोड्या करा. प्रत्येकजण आपापल्या रंगाच्या भूमिकेत जा. उदा. पांढऱ्या रंगाच्या सदस्याने पांढऱ्या रंगाची भूमिका, त्याच्या भावना, त्याची मते असा सर्व विचार करावा आणि हा पांढरा रंग, काळ्या रंगाशी काय-काय बोलेल? सुरुवातीला स्वत:च्या रंगाबद्दल व नंतर जोडीच्या रंगाबरोबर काय चर्चा करेल? अशी कल्पना करा. अशी कलात्मक चर्चा करण्यासाठी १५-२० मि. वेळ घ्या. तुमच्या चर्चेचे मुद्दे काढा. हा रंगा-रंगांमधील संवाद/चर्चा गटासमोर नाट्यरूपात सादर करा. या सादरीकरणाचे मोबाईलवर शूटिंग करा. सादरीकरणास प्रत्येक गटास ३ ते ४ मिनिटे द्या. सर्व गटांचे सादरीकरण झाल्यावर सर्व रंगांच्या जोड्यांनी एकत्र बसून खालील मुद्द्यांवर चर्चा करा.

**चर्चेसाठी मुद्दे –** • खेळ आवडला का? • रंगाच्या भूमिकेत जाता आले का? • रंगाच्या भूमिकेत जाताना काय अडचणी आल्या? त्यावर तुम्ही कसा मार्ग काढला? • कोणत्या रंगाची भूमिका करायला सोपी वाटली किंवा अडचण आली?

– **जया बदी,** ज्ञान प्रबोधिनी, ५१४, सदाशिव पेठ, पुणे – ३०

## पेनाचा इतिहास

लिहिण्याच्या कलेचा मानवाच्या संस्कृतीबरोबर हळूहळू विकास होत गेला. अगदी आरंभीच्या काळात माणूस अणकुचीदार गारगोट्यांच्या साहाय्याने गुहेतील भिंतीवर खरवडून नोंदी करू लागला. मग वनस्पतींच्या रसांमध्ये व प्राण्यांच्या रक्तामध्ये हाताचे बोट बुचकळून त्या बोटाचा लेखणी म्हणून वापर करू लागला.

आपल्या भारतात प्राचीन काळी पक्ष्यांच्या पिसांचा लेखणी म्हणून वापर होत होता. इजिप्तमधील माणसे एका पोकळ देठाच्या टोकाशी तांब्याच्या धातूचा एक तुकडा बांधत. हा तुकडा आपल्या आजच्या निबासारखा असायचा. ग्रीक माणसे लेखणी म्हणून धातूचा, हाडाचा, हस्तीदंताचा किंवा मेणाचे आवरण असलेल्या वड्यांचा वापर करीत.

इ. स. १९५० पर्यंत प्राथमिक शाळांमधील मुले बोरूचा वापर लेखणी म्हणून करीत. बोरू बांबूपासून बनवीत. बोरूचे टोक उत्तम तासणे ही एक कला होती. पोलादी निबाचे फाऊंटन पेन इंग्लंडमध्ये इ. स. १७८० च्या सुमारास प्रथम वापरात आले. शाई निबामधून झरझर खाली उतरावी म्हणून निबाला मधोमध फट पाडण्यात आली. पेन लोकप्रिय होण्यास चाळीस वर्षांचा अवधी लागला. आधुनिक धाटणीचे पहिले फाऊन्टन पेन अमेरिकेत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस वापरात आले.



*उन्ह सत्वशील ज्योतीसंगे जळे। श्रद्धेच्या ताटात आयुष्य उजळे।।*



**जरूर पाहा : व्हिक्टोरिया ज्युबिली संग्रहालय,** विजयवाडा, आंध्रप्रदेश (बुद्ध आणि हिंदू संस्कृतीतील शिल्पे, चित्रे इ. पुरावशेष)

**प्रायोजक - डॉ. विनायक देसूरकर, पुणे**

(अभ्यासातील स्वावलंबन)

# चला करूया इतिहासाचा अभ्यास

**– सुहासिनी देशपांडे**



**इतिहास म्हणजे नुसत्या सनावळी, वंशावळी, लढाया आणि राज्यक्रांत्या... असं तुम्हापैकी काहीजणांना वाटतं, हो ना? तर काहींना माहितीच्या रूक्ष मांडणीमुळे इतिहासाचा तास *बोअर* वाटतो. पण इतिहास खरंच इतका *बोअरिंग* विषय आहे का? एखाद्या विषयाकडे पाहाण्याची, अभ्यास करण्याची योग्य दृष्टी मिळाली की नावडता विषयही आवडता होऊ शकतो.**

'ईऽऽ य्याऽऽ! सुटलो! आता उद्या इतिहास.' उद्या इतिहासाचा पेपर आणि मुलं आनंदात आहेत!! इतिहास शिक्षक म्हणून मला बरं वाटलं. थोडा वेळ कानावर मुलांचे जे संभाषण येत होते ते ऐकताना मी एकदम स्तब्ध झाले आणि विचारात पडले.

अर्थात, नेहमीच्याच होत्या प्रतिक्रिया. कुणाला इतिहास मुळातच आवडत होता म्हणून आनंद होता. कुणाला कुथून घोकून इतिहासाचा अभ्यास तयार करून बऱ्यापैकी गुण मिळवता येतात, हे समजल्यामुळे इतिहास विषय म्हणून '*ओके ओके*' वाटत होता. तर कुणाला इतिहास म्हणजे थापा मारण्याचा विषय वाटत होता.

मला पुढे ऐकवेना. खरंच इतिहास थापाथापी करण्याचा विषय आहे का? इतिहास इतका नगण्य विषय आहे का, की काहीही लिहून पोटापाण्यापुरते गुण मिळवले की झालं? गंगेत घोडं न्हालं??

खूप मुलांना इतिहासाचा कंटाळा येतो, विषय *बोअर* वाटतो, काय चाललंय, कुठे चाललंय, हे आधी घडलं की ते मग घडलं, कोण कुणाचा कोण? हेही कळत नाही. याला कारण असं आहे की कोणताही विषय समजून घेताना ज्ञाताकडून अज्ञाताकडे– जाणं सोपं असतं. इतिहास हा विषयच मुळी अज्ञाताविषयी जाणून घेण्याचा. ते जमले नाही तर मग मनाचा गोंधळ उडतो. दुसरं इतिहासाची व्याप्ती ही अत्यंत मोठी आहे. स्थानिक इतिहास, गावाचा इतिहास, राज्याचा इतिहास, देशाचा इतिहास, युरोप/अमेरिका/आशिया त्यातही आग्नेय आशिया/ अतिपूर्व/ मध्य आशिया असा खंडांचा इतिहास अशा वेगवेगळ्या व्याप्तीवर इतिहासाचा अभ्यास करावा लागतो. त्याही पुढे जाऊन जगाचा इतिहास, मानवी संस्कृतीचा इतिहास, विविध संस्कृतींचा इतिहास, किंवा कालखंडानुसार प्रागैतिहासिक काळ, ऐतिहासिक काळ, प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन इतिहास वा आधुनिक जगाचा इतिहास अशा विविध टप्प्यांचा इतिहासात अभ्यास करता येतो. मग हे सगळे कसे काय अभ्यासायचे असा प्रश्न पडतो. त्यासाठी कोणकोणत्या पद्धतींनी अभ्यास करता येईल?

शालेय स्तरावर आपण याचा विचार केंद्रित करूया. इथे इतिहासाची आवड निर्माण झाली तर ती पुढे वाढत जाईल; नाहीतर इतिहासाविषयी नावड निर्माण होऊन कायमचाच हा विषय आपण *ऑप्शनला* टाकून देऊ. आणि तसे करून तर चालणार नाही. इतिहासच विसरलो



*वारा पाऊस झेलत उभे, पिवळे–पिवळे कडक ऊन। शिळोप्याच्या सीमेवर गप्पा टप्पा कोवळी धून।।*

**जरूर पाहा : भगवान महावीर सरकारी संग्रहालय,** कडप्पा, आंध्रप्रदेश (शंकर, विष्णू, गणपती अशा देवांच्या पुरातन मूर्ती)



**प्रायोजक - श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली**

तर स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखी आपली अवस्था होईल. स्मृतिभ्रंश झालेल्या माणसाला प्रत्येक गोष्ट पहिल्यापासून शिकवावी लागते. आपण इतिहास विसरलो तर...? आपल्या आजच्या समस्यांची उत्तरं आपल्याला इतिहासात शोधता येतात आणि आपला उज्ज्वल भविष्यकाळ घडवणं त्यामुळे शक्य होतं. इतिहास म्हणजे वर्तमानाचा भूतकाळाशी चाललेला सतत संवाद आहे; ज्याचा पूल करून आपल्याला भविष्यकाळाकडे वाटचाल करायची असते. इतिहासातून स्फूर्ती घेऊन, इतिहासात घडलेल्या चुकांपासून धडे घेऊन आपल्याला आपला वर्तमानकाळ घडवायचा असतो.

मानवता, अहिंसा, सत्याचा आग्रह अशी कितीतरी मूल्ये इतिहासातून आपल्यापर्यंत येतात, रुजतात. इतिहासातून तुम्ही केवळ स्फूर्तीच घेता असं नाही तर धाडस, शौर्य, क्षमाशीलता, स्वार्थत्याग, चिकाटी, कार्यनिष्ठा, प्रामाणिकता, सेवाव्रत असे कितीतरी गुण इतिहास आपल्याला शिकवतो. गुहेत राहाणाऱ्या पूर्वजांपासून ते चाकाचा शोध लावणाऱ्या, शेती करणाऱ्या मानवापर्यंत झालेली प्रगती, सभ्यता आणि संस्कृती यांचा हातात हात घालून झालेला विकास आपल्याला इतिहासातून समजून घेता येतो. संपन्न आणि प्रगल्भ झालेले मानवी जीवन हे इतिहासाच्या अभ्यासातून प्रतीत होते.

इतिहासाच्या छत्राखाली कोणता विषय येत नाही? खाण्यापासून गाण्यापर्यंत सर्व विषय येतात. अनेक सामाजिक विषयांची इतिहास म्हणजे तर *लॅबोरेटरी* समजली जाते. मग प्रश्न येतो माणूस युद्धखोर का बनला? त्याची कारणे त्याच्या भौतिक प्रगतीत आहेत का? एकीकडे मानव अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी चिंतन करतो तर दुसरीकडे तो अखिल मानवजातीच्या संहाराची साधनं शोधून काढतो आहे. एकीकडे अज्ञात भूप्रदेशांचा शोध घेण्यासाठी तो साहसी भौगोलिक शोधयात्रा काढतोय आणि दुसरीकडे नव्याने शोधलेल्या भूप्रदेशावर कब्जा करण्यासाठी तेथील लोकांना गुलाम बनवतोय. त्यांच्या-त्यांच्या मूळ वैभवशाली संस्कृतींना मूठमाती देण्याच्या क्लृप्त्या शोधून काढतोय. माणसांचा व्यापार करतोय. यातूनच वसाहतवादी, साम्राज्यवादी वृत्ती वाढीस लागतेय. आपली साम्राज्ये वाढावीत म्हणून आपल्या प्रतिस्पर्ध्यांना विरोध करतोय. या जीवघेण्या साम्राज्यवादी स्पर्धेतून दोन महायुद्धं घडून येतात! तिसऱ्या महायुद्धाची छाया निर्माण करणारं शीतयुद्धही यातूनच सुरू होतं. एकाच बॉम्बमध्ये अनेकदा पृथ्वीचा संहार होईल अशी घातक अस्त्रं आपल्याजवळ हवीत यासाठी मग स्पर्धा सुरू होते राष्ट्राराष्ट्रांत..!

या सगळ्या वैश्विक चित्रात आपला देश कुठे बसतो? माहिती असायला हवं की नको? आपली भूमिका काय? आपल्या देशाचं प्राचीन काळापासून आजतागायत विश्वसंस्कृतीला काय योगदान आहे? आम्ही कशाचा अभिमान बाळगायचा? कुठे कमी पडलो किंवा कुठे मागे पडतो आहोत याचा शोध घ्यायचा तर इतिहासाचं बोट धरावंच लागणार ना? आता तर आपण *ग्लोबलायझेशनची* बात करतो. मग माहिती असायलाच हवं ना *ग्लोबलायझेशन* म्हणजे काय ते? त्याचे फायदे, त्याचे तोटे? त्यात टिकून राहण्यासाठी आपली भूमिका काय हवी? 'घोका आणि पोटापाण्यापुरते गुण मिळवा' या आपल्या लघुदृष्टीला कुठे स्थान आहे का बघा. थापांचा दांडपट्टा परीक्षेच्या मैदानात चालवून थोडं निभावून न्याल; पण कुठवर? आपल्याला मोठं मैदान मारायचं आहे! आणि त्यातून सुटका नाही.

आपल्या देशाचा जबाबदार नागरिक म्हणून तर आपल्याला आपल्या देशाचा इतिहास माहिती असायला हवा. तसेच या 'वैश्विक खेड्या'चा एक जबाबदार नागरिक - *ग्लोबल सिटीझन* म्हणून आपल्याला आपल्या या जगाचा इतिहास, जगातील चालू घडामोडींचा इतिहास माहिती करून घेणे अपरिहार्य आहे.

आता प्रश्न आहे इतिहासाचा अभ्यास कसा करायचा? सनावळी म्हणजे इतिहास नाही हे बरोबर आहे; पण एखादी घटना कधी घडली याची नेमकी माहिती असायला हवी, ती लक्षात ठेवायला हवी. मग **कालरेखा** तयार करू या. तुमच्या अभ्यासाच्या टेबलाच्या बाजूच्या भिंतीवर, अभ्यासाच्या एका कोपऱ्यात तुम्ही इतिहासातील कालरेखा आपली आपण तयार



*हळू बोलुनी हुंकारते हो तृणपाते। डोलडोलुनी अमाप उगवे कोवळे नाते।।*

**जरूर पाहा : विश्वेश्वरय्या संग्रहालय,** बंगळुरू (विज्ञानातील अद्‌भुत चमत्कारांचे, शोधांचे भव्य संग्रहालय)

**प्रायोजक - डॉ. प्रियदर्शी सावंत, बोरीवली**

करून लिहून ठेवा. उदाहरणार्थ, राज्यक्रांत्यांचा किंवा आधुनिक जगातील महत्त्वाच्या क्रांत्यांचा इतिहास आहे. औद्योगिक क्रांतीने आधुनिक जगाची पहाट झाली. त्यातून वसाहतवाद–साम्राज्यवाद उदयाला आला. त्यातून अमेरिकन वसाहतींनी आपल्या इंग्रज साम्राज्यवाद्यांविरूद्ध उठाव केला. म्हणजेच अमेरिकन क्रांती, अमेरिकन क्रांतीमध्ये लढलेले फ्रेंच सैनिक, त्यांनी आपल्या देशात जाऊन राजघराणे आणि अमीर–उमरावांच्या विशेषाधिकार प्राप्त वर्गाविरुद्ध शोषित–पीडित अशा सर्वसामान्य जनांच्या अधिकारासाठी, स्वातंत्र्यासाठी क्रांती केली. जगाला 'स्वातंत्र्य–समानता–बंधुता' ही आधुनिक मूल्ये दिली. मग रशियन क्रांती, जी मार्क्सवादावर आधारित होती आणि मार्क्सवाद ही खरे तर औद्योगिक क्रांतीचीच देन होती. असा एकातून दुसऱ्या, दुसऱ्यातून तिसऱ्या साखळीचा शोध घेत गेलो तर आधुनिक जगात वैचारिक अभिसरण होत क्रांतीची लागण कशी पसरत गेली हे लक्षात येईल आणि कालरेखा तयार केली तर सनसनावळींचा बाऊ वाटणार नाही. अशा छोट्या छोट्या घटकांच्या/उपघटकांच्यासुद्धा कालरेखा तयार करता येतील. जसं भारतीय राष्ट्रसभेचा(काँग्रेस)चा इतिहास, ब्रिटिशांच्या काळातील संवैधानिक सुधारणांचा इतिहास इत्यादी.

यांशिवाय, विविध क्रांत्यांचा **तुलनात्मक अभ्यास** करता येईल. उदा. अमेरिकन राज्यक्रांतीची कारणं आणि फ्रेंच राज्यक्रांतीची कारणं. एकाच वेळी तुलनात्मक अभ्यासाने दोन्हींचे चित्र अधिक स्पष्ट होईल आणि मग फक्त परीक्षेपुरता 'घोका आणि ओका' असा मार्कांचे तात्पुरते उद्दिष्ट साध्य करण्यापुरता अभ्यास न राहता तो कायमस्वरूपी आनंदाचा, ज्ञानाचा ठेवा आपल्याजवळ शिदोरीसारखा राहील.

बरेचदा आपल्याला इतिहास समजत नाही तो भूगोलाशी आपण फटकून वागल्यामुळे! भूगोलाशिवाय इतिहास अधांतरी आहे. आपण डोळे झाकून चालू लागलो तर कसं होईल? तसंच भौगोलिक संदर्भाशिवाय इतिहासात आपण चाचपडत राहतो. त्यासाठी **नकाशावाचन** करण्याची सवय ठेवायला हवी. जमेल तितकी भटकंती करायला पाहिजे. आपापल्या शहरात/गावातसुद्धा इतिहास घडलेला, दडलेला असतो तो जाणून घेता येईल. शिवाजी महाराजांचा इतिहास, लढाया, मोहिमा जाणून घ्यायच्या तर गड–किल्ल्यांच्या सहली, *ट्रेक्स* आयोजित होत असतात. त्याबरोबर जाऊन **प्रत्यक्ष स्थळांना भेटी** देता येतील. आपल्या शहरात आता इतिहास तज्ज्ञांनी आणि मार्गदर्शकांनी *हेरिटेज वॉक* सुरू केले आहेत, उत्साहाने त्यात सहभागी व्हायला हवे. शहरात ऐतिहासिक वस्तूसंग्रहालयं असतात, त्यांना भेटी देऊन जाणून घेतलं पाहिजे. आता शहराशहरांतून *'लाइट अॅन्ड साउंड शोज्'* तयार करून दाखविण्याची सोय झाली आहे. त्याचा फायदा आपण घेऊ शकतो. एक असा *शो* तयार करताना तज्ज्ञांनी पाच–पंचवीस संदर्भग्रंथांचा आधार घेतलेला असतो. म्हणजे इतिहास काही पाठ्यपुस्तकाच्या अर्धा सेंटीमीटर जाडीच्या नव्वद पानी पुस्तकातच मर्यादित आहे, असे समजून चालणार नाही. पाठ्यपुस्तक तुम्हाला फक्त बोट धरून थोडं थोडं मार्गदर्शन करत राहील, फार तर तुम्हाला थोडे प्रश्न विचारून बरोबर मार्गावर चाललात ना हे लक्षात आणून देईल. (थोडे प्रश्न म्हणजेच परीक्षा–चाचण्या इ.)! आसपास, अलीकडे पलीकडे, इकडे–तिकडे बघायला तुमची सारी ज्ञानेंद्रिये जागी ठेवून तुम्हालाच काम करायचे आहे. त्यासाठी **अवान्तर वाचन** आपल्या कामी येईल. ऐतिहासिक कथासंग्रह, कादंबऱ्या, चरित्रे यांच्या वाचनाने आपल्या मनाच्या कक्षा वाढतील, आपलं परिप्रेक्ष्य वाढेल. उदाहरणार्थ काही पुस्तके मी सुचवेन– राजा शिवछत्रपती, छावा, स्वामी, नाझी भस्मासुराचा उदयास्त, इस्रायल– युद्ध–युद्ध आणि युद्धच, इस्रायल– छळाकडून बळाकडे, क्रांतिकारकांच्या कथा (वि. श्री. जोशी), १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध... नेताजी, पानिपत, हिटलरचे महायुद्ध... अशांसारखी तुम्हीसुद्धा तुमची पुस्तकयादी तयार करून आपले इतिहासाचे ज्ञान वाढवू शकता.

तुम्ही म्हणाल, 'हे आम्ही सगळं करू; पण आम्हाला पाठ्यपुस्तक आणि त्यावर आधारित परीक्षा याला तोंड द्यायचं असतं, वस्तुनिष्ठ प्रश्नात सुद्धा आम्ही मार खातो, त्याचं काय?'



*कधी शब्द, आकाशाच्या आरशात पाहणारा। कधी शब्द, प्रकाशाच्या किरणात नाहणारा।।*



**जरूर पाहा : नॅशनल रेल संग्रहालय,** दिल्ली (रेल्वेचा १५० वर्षांचा इतिहास)

**प्रायोजक - श्री. सौरभ सुधीर दप्तरदार, पुणे**



त्यासाठी आपण आणखी एक **खेळ** शोधून काढू या. *क्वीझ कॉन्टेस्ट*. इतिहासातील 'कौन बनेगा करोडपती'! आपण प्रश्न तयार करूया आणि त्याचे पर्याय तयार करूया. पर्याय तयार करतानासुद्धा आपल्या बुद्धीची कसोटी असते. कारण आपल्याला पर्याय असे तयार करायचे असतात की त्यामुळे उत्तर देणाऱ्याचे चित्त विचलित झाले पाहिजे. त्या पर्यायांना *डिस्ट्रॅक्टर्स* म्हणतात ते याचसाठी. त्यात जो पक्का खिलाडी असतो तो अविचलपणे सत्य किंवा अचूक पर्यायावर ठाम राहतो. आणि आपल्यालाच असा पक्का खिलाडी बनायचंय. हा खेळ शाळेत मोकळ्या तासांना किंवा मुद्दाम एखाद्या इतिहासाच्या तासाला खेळता येईल. यासाठी शिक्षकांची मदत घेतली तर मग अधिक छान.

इतिहासातला आणखी एक गोंधळ उडवून देणारा भाग म्हणजे कोणाचा कोण? राजघराण्यांचा इतिहास म्हणजेच केवळ इतिहास नव्हे, असं असलं तरी काही राजघराण्यांचा अभ्यास करणं भाग पडतं. जसं की मराठेशाहीतील छत्रपतींचं घराणं, पेशवाई राजवट, दिल्ली सल्तनतीचा काळ, मुघलशाही काळ वगैरे. त्यासाठी आपण **वंशवृक्ष** तयार करू शकतो आणि तो आपल्या अभ्यासाच्या ठिकाणी लावला तर तुमच्या लक्षात राहणं सोपं जाईल.

इतिहासाच्या अध्ययनासाठी **प्रकल्प** तर खूपच उपयोगी आणि *इन्टरेस्टिंग* असतात. आपल्या आवडीचा प्रकल्प निवडायचा, त्याचं उद्दिष्ट निश्चित करायचं, त्याचं स्वरूप– म्हणजे– माहिती स्वरूपात धारिणी तयार करायची की प्रतिकृती तयार करायची की दोन अथवा अधिक विषयांशी संलग्न असा इतिहास प्रकल्प विषय निवडायचा, की कोष्टक स्वरूपात *चार्टस्* बनवायचेत हे आपण शिक्षकांच्या मदतीनं निश्चित करू शकतो. दोन तीन विषयांशी संलग्न प्रकल्पाचं एक उदाहरण मला आठवतंय. आमच्या एका प्रतिभावान विद्यार्थ्यानं '१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातील उद्रेकाची ठिकाणे' असा प्रकल्प उठाव–नकाशा आणि विजेच्या उपकरणांचा वापर करून केला होता. म्हणजे १८५७ चा इतिहास, उठावाची ठिकाणे दाखविणारा तात्कालीन भारताचा नकाशा आणि त्या त्याठिकाणी छोटे बल्ब लावून त्याची *सर्किट्स* जोडून खूप आकर्षक *कॉमेन्ट्रीद्वारे* इतिहासाचे कथन– असा तो बहुआयामी प्रकल्प त्यानं केला होता. प्रकल्पासाठी आपल्याला विविध पातळीवर काम करावं लागतं. मुलाखती घेणं, वृत्तपत्रातील विशिष्ट घटनेवर येणाऱ्या बातम्यांची संग्रहवही करून चिकट पुस्तक बनवणं, शहरात चालणारी व्याख्यानं ऐकणं, त्यांचं इतिवृत्त तयार करणं, संसदेतील भाषणं ऐकणं, त्यावर टिपणं तयार करणं अशाप्रकारे आपण आपली कल्पकता वापरून छान प्रकल्प निवडून तो करू शकतो.

संसदेतील भाषणं ऐकली आहेत तुम्ही? किंवा विविध वृत्तवाहिन्यांवर चाललेल्या चर्चा–वादविवाद? किती ऐतिहासिक संदर्भ तोंडपाठ असावे लागतात वक्त्यांचे? हातात पुरावे ठेवून बोलावे लागते, सखोल अभ्यास करावा लागतो त्यासाठी! मग मला सांगा इतिहास असा जर थापा मारण्याचा विषय असता तर? आणि इतिहास जर *बोअरिंग* असता तर महाराष्ट्राचे लाडके शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, निनादजी बेडेकर, अविनाश धर्माधिकारी यांची व्याख्याने कुणी कशाला ऐकली असती, नाही का?

तेव्हा आता इतिहासाची व्याख्या लक्षात ठेवायची **– इति+ह+आस म्हणजे 'असे असे घडले.'**

❁❁

**– सुहासिनी देशपांडे**
३, पुण्यश्री अपार्ट, रस्ता क्र. ७,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे 411038

*खळाळणारे झरे सानुले हिरवी हिरवी राई। गिरिशिखरांचे उन्नत सुळके मनास मोहून घेई।।*

**जरूर पाहा : चंदीगढ सरकारी संग्रहालय आणि कलादालन,** चंदीगढ (राष्ट्राचा इतिहास, चित्रे, स्थापत्यशास्त्र विभाग)

**प्रायोजक - श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे**

# ढोल्या

**– डॉ. महेश केळुसकर**



अनिल साहावीत होता. तसा चांगला मुलगा होता तो. वेळेवर शाळेत यायचा-जायचा. वेळेवर अभ्यास करायचा. नेहमी नीटनेटका राहायचा. शिक्षकांनी सांगितलेलं ऐकायचा. कॅरमच्या स्पर्धांमध्ये तर पहिला नंबर अनिलचाच. त्याचे बाबा एका कंपनीत कामाला होते, तर आई नर्स. आपल्या आई-बाबांचा अनिल लाडका होता.

फक्त एक गोष्ट अनिलला जमत नसे. ती म्हणजे आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवणं. बरं त्याचा काही एखाद-दुसरा पदार्थच आवडता होता असं नव्हे. त्याला रवा लाडू आवडायचे आणि मोतीचुराचेही. मोठ्ठं पातेलं भरून बासुंदी लागायची. तीन तीन मसाला डोसे फस्त करायचा. कधी त्याचे पॅन्टचे खिसे तपासले तर डाव्या खिशात शेव-पापडी अन् उजव्या खिशात खोबऱ्याच्या वड्या नाही तर काजू-बदाम-पिस्ते सापडलेच पाहिजेत. बरं एवढं सगळं फस्त करून व्यायाम म्हणाल तर काय – छेऽऽ साहेबांना व्यायामाचा जाम कंटाळा.

मग 'ढोल्याऽऽ ढोल्याऽऽ' म्हणून कुणी म्हटलं तर राग कशाला यायला हवा! पण अनिलला यायचा. एखाद्या मुलानं 'ढोल्याऽऽ' म्हणून हाक मारली की चिडायचाच... ढोल्या का म्हणतो रे मला गाढवाऽऽ' असं डाफरत तो त्या चिडवणाऱ्या मुलाच्या अंगावर धावून जायचा. हा चिडला की मुलांना अधिक मजा वाटायची. मग कोणी अनिल वर्गात नसताना फळ्यावर त्याचं कार्टून काढून खाली 'ढोल्या' असं लिहायचा, तर कोणी 'ढोल्या-इयत्ता पाचवी' असं पाकिटावर लिहून शिपायाकडं द्यायचा. गॅदरिंगच्या नाटकात काम करावं आणि सगळ्यांकडून कौतुकाच्या टाळ्या घ्याव्यात, असं अनिलला खूप वाटायचं. पण वर्गप्रमुख म्हणायचा, ''अरे अनिल बकासुराचा नाही तर भीमाचा *रोल* असेल तेव्हा तुला घेऊ हो नाटकात'' आणि तसा *रोल* कधी नसायचाच.

जसजसा अनिल मोठा होऊ लागला तसतसा त्याचा रागसुद्धा मोठा व्हायला लागला. ढोल्या म्हणून चिडवणाऱ्या बारक्या पोरांना तो बेसावध गाठून बदडायला लागला नि आपल्यापेक्षा वयानं मोठ्या असणाऱ्या मुलांना टाळायला लागला. एकदा वर्गात हिंदीच्या टीचरनी 'मोटुराम की कहानी' हा पाठ शिकवायला घेतला नि सगळा वर्ग अनिलकडे चोरून बघत सरांच्या नकळत फिदीफिदी हसायला लागला. त्या पाठातला मोटुराम हा अनिल सारखाच गोलमटोल नि गुबगुबीत होता. त्यालाही भरपूर खाण्यापिण्याची आवड होती. त्याला झाडावर चढता येत नव्हतं की तुरूतुरू पळता येत नव्हतं. अजागळ आणि गबाळा मोटुराम सगळ्यांच्या चेष्टेचा विषय होतो आणि मग अभ्यासावरचं लक्ष उडाल्यामुळे



*निळ्या धुक्याचे पटल रेशमी, कुठे सांडते ऊन। कधी अचानक कानी पडते, कोकिळेची धून।।*

**जरूर पाहा : भारतीय हवाईदल संग्रहालय,** नवी दिल्ली. (भारतीय हवाईदलाच्या स्थापनेपासूनचे फोटो, गणवेश, शस्त्रे)



**प्रायोजक - श्री. निखिल धारवाडकर, बंगळुरू**

परीक्षेत नापास होतो, असा तो धडा होता.

हा पाठ शिकवून झाल्यावर संध्याकाळी अनिल घरी गेला तोच मुळी धुसफुसत. त्यानं, 'ए ढोल्या किती वाजले रे?' असं विचारणाऱ्या गल्लीतल्या पोराला बेदम मारलं. आई घरात शिरल्या शिरल्या त्यानं *डिक्लेअर* केलं, ''ए आई-उद्यापासून मी अजिबात या शाळेत जाणार नाही.''

''काय रे काय झालं अचानक?''

''पहिल्यांदा फक्त काहीजणच चिडवायचे. आता तर सगळा वर्ग माझ्याकडे पाहून फिदीफिदी हसायला लागलाय.''

''कशाकरता पण-?''

''अगं सगळेजण मला ढोल्याऽऽ ढोल्याऽऽ, म्हणून चिडवून हैराण करतात, गाढव कुठले.''

''अनिल, असं नाही बोलायचं. शिव्या नाही द्यायच्या कुणाला.''

''मग मला उगाचच्या उगाच चिडवतात ते! मी त्यांचं काय केलंय गं...? वर्गप्रमुख पण मला नाटकात घेत नाही. तो म्हणतो, बकासुराचा रोल नाही आमच्याकडे,'' रडवेल्या आवाजात तक्रार करणाऱ्या अनिलकडे त्याच्या आईला बघवेना. तिनं पटकन त्याला कुशीत घेतलं नि त्याचे डोळे पुसत त्याला थोपटत म्हणाली, ''असं रडायचं नाही बाळ. रागावायचं पण नाही. आपण बघू काय करायचं शाळेचं ते. तू पहिल्यांदा हात-पाय धुऊन मी काय आणलंय ते खाऊन घे बरं आधी. नंतर आपण बोलू या.''

''काय आणलंयस तू?''

''अरे, तुझ्या आवडीची जिलेबी घेऊन आलेय. आज तुझ्या पप्पांचा वाढदिवस आहे ना.''

अनिल घुटमळला. 'जिलेबी'चं नाव काढताच आनंदानं उड्या मारणारा अनिल थंड आवाजात म्हणाला, ''मला नको जिलेबी आई. चुरमुरेच खाईन मी...''

''आता मात्र धपाटे देईन हां मी तुला. चार जिलेब्या खाऊन लगेच कुणी जाड नाही होत. चलऽऽ पटकन हातपाय धुऊन घे,'' आई म्हणाली.

''पण तूच तर म्हणतेस ना... खूप गोड आणि तेलातुपाचं खात राहायचं नाही म्हणून''

''पण मुळीच खायचं नाही, असंही नाही मी कधी सांगितलेलं. आणि भूरपूर खाल्लं तरी भरपूर व्यायाम करायला पाहिजे, हेही मीच सांगितलंय. हो की नाही?''

व्यायामाचं नाव काढताच अनिल तिथून पटकन बाथरूममध्ये सटकला. त्यानं हातपाय धुतले. देवघरात जाऊन अगरबत्ती लावली नि स्वयंपाकघरातमध्ये आला.

''आई, दे आता जिलेबीऽऽ''

आईनं हसत-हसत त्याला जिलेब्या दिल्या आणि त्याच्या केसात हात फिरवत ती बोलू लागली...

''बाळा अनिल, तू इतर मुलांपेक्षा पहिल्यापासून थोडा गुटगुटीत आहेस, म्हणून वाईट वाटून घेऊ नकोस. वेगवेगळे पदार्थ करून तुला खायला द्यायचे, हा माझा आवडता छंद होता. पण माझ्या हे लक्षात नाही आलं की तुला पहिल्यापासून व्यायामाचीही सवय लावायला हवी होती. अंगाला धूळ माती लागते नि इथं तिथं खरचटतं म्हणून मी तुला खेळायला पाठवत नव्हते. मग तू नाईलाजानं बैठे खेळ खेळायला लागलास आणि तुझा मेद वाढत गेला. सगळे तुला 'ढोल्या' म्हणून चिडवायला लागले आणि त्याचा तुला राग येऊ लागला.''

''पण मग मला येतोच खूप राग त्यांचा-'' आईनं अनिलला पुन्हा थोपटलं... ''अनिल, जगात तू किती दिवस किती लोकांवर रागावत राहणार आहेत?''

''मग काय करू मी आई? मी ढोल्या आहे म्हणून कुणालाच आवडत नाही.''

''मला आवडतोस,'' असं म्हणत मोठ्यांदा हसत पप्पा आत आले... ''बाहेर येऊन बघ अन्या, तुझ्यासाठी काय आणलंय ते!'' पप्पा म्हणाले.

''ओऽऽ सायकल! *यू आर ग्रेट पप्पा. हॅप्पी बर्थ* डे टू यूऽऽ,'' असं म्हणत अनिल सायकलकडे धावला.




*पाहून इथला परिसर अवघा, आनंदून जातो। खळखळणाऱ्या झऱ्यासंगती रानाचा होतो।।*



**जरूर पाहा : रणगाडे संग्रहालय,** अहमदनगर, महाराष्ट्र (विविध युद्धांमध्ये वापरलेले रणगाडे)

**प्रायोजक - श्री. अजित कानिटकर, पुणे**



''हांऽऽ *बर्थ डे* माझा. पण *गिफ्ट* मी तुला देतोय.''

''तुम्हाला मी मोठा झाल्यावर *गिफ्ट* देईन पप्पा.''

''अजिबात नाही. मला पण तू आजच एक *गिफ्ट* द्यायची. बोल देतोस का? शिवाय त्या *गिफ्टला* पैसेही नाही लागणार.''

''बोला पप्पा काय देऊ तुम्हाला *गिफ्ट*?''

''तू आज मला *प्रॉमिस* द्यायचं, की तू ही सायकल रोज सकाळी अर्धा तास आणि संध्याकाळी अर्धा तास चालवशील म्हणून.''

अनिल महाराज विचारात पडले. चाचरत म्हणाले, ''चालवीन ना, वेळ मिळेल तेव्हा तेव्हा मी सायकल चालवीन पप्पा.''

''तसं नाही. वेळ मिळेल तेव्हा नाही. वेळ काढीन, असं म्हणायचं. बघ तरी बेटा एकदा *प्रॉमिस* देऊन. तू ते पूर्ण करशील, याची मला खात्री आहे.''

अनिलनं आईकडे बघितलं. तिनं हसून 'देऊन टाक *प्रॉमिस*' म्हणून मान हलवली. आणि अनिलनं पप्पांच्या हातावर हात ठेवीत म्हटलं, ''पप्पा, मी तुम्हाला *प्रॉमिस* देतो, यापुढे मी भरपूर व्यायाम करीन. रोज एक तास सायकल चालवीन. रोज ११ सूर्यनमस्कार घालीन. आणि रोज २१ दंड बैठका काढीन.''

''शाब्बास! आणि मग एक वर्ष पूर्ण झाल्यावर सांग कोण तुला ढोल्याऽऽ म्हणतो का ते? अरे, तू एकदम सही होऊन जाशील.''

''खरंच पप्पा?''

''खरंच रे ढोल्याऽऽ'' असं पप्पांनी म्हटलं आणि त्यांना पकडायला येणाऱ्या अनिलला चुकवत पप्पा इकडून तिकडे खोटं खोटं पळायला लागले...

❁❁

**– डॉ. महेश केळुसकर**
२०३, 'रामेश्वर', धोबी आळी,
चरई, ठाणे (प.)400601



*पानगळीच्या पालखीतही, बसून येते नवी पालवी। ही तर आहे फक्त सलामी, दुःख कशाचे उगा करी।।*

**जरूर पाहा : रवींद्र भारती संग्रहालय,** कोलकता, पश्चिम बंगाल (रवींद्रनाथ टागोरांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा संग्रह)



**प्रायोजक - सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई**

# ऊठ मुला

ऊठ मुला थांबून आता
तुला नाही चालणार
हातपाय गाळून यश
कसे रे मिळणार ?

ठेचाळून पडला जरी
जो येतो वाटेवर
त्याच्यासाठी नव्या वाटा
मग होतात हजर

ध्यानात ठेव संकटात
रडून नाही चालत
धाडसाच्या मागे यश
येत असते धावत

या जगी नाही बरं,
काहीच अशक्य
वाळवंटी नंदनवन
फुलवणेसुद्धा शक्य

माणसाने आकाश
बघ घेतले कवेत
सागराचा तळही कसा
गाठला दमात

केल्याने होत आहे
याचे राहू दे रे भान
चिकाटीला यश आहे
चिकटलेले तू जाण

निराशेच्या काळोखाला
दे लखलखते उत्तर
श्रमाची बांधून पूजा
कर प्रयत्न सत्वर .



**– एकनाथ आव्हाड**
अ/२०२, भाग्यवान सोसायटी, खारदेवनगर, एन. जी. आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई

*आठवतो मज भव्य हिमालय, मन झेपावे तेथे। आमचे आणि हिमालयाचे अतूट आहे नाते।।*

**जरूर पाहा : श्रीमंत शंकरदेव कलाक्षेत्र संग्रहालय,** गुवाहाटी, आसाम (श्रीमंत शंकरदेवांची शिल्पे, विविध पुरातन वस्तू)

**प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

# कोरा स्पर्श - कोरा गंध

**- सुनीला गोंधळेकर**



मे महिन्याच्या शेवटी शेवटी जूनची चाहूल लागते. जूनचे वारे वाहू लागतात म्हणा ना. हो, इतर महिन्यांना नसले तरी जून महिन्याला स्वतःचे खास वारे असतात. शालेय विश्वात जून महिना म्हणजे अगदी कोरा करकरीत नवा महिना. या महिन्याला असतो एक सुंदर कोरा वास, एक कोरा सुगंध. जून महिन्यात पुस्तकांच्या दुकानात गर्दी होते. पुस्तकं, वह्या, कंपास, पट्टी, पेन्सिल, रंग, खोडरबर, दप्तर, गणवेश आणि कशाकशाची खरेदी होते.

सारंच नवीन आणि अगदी कोरं. नवीन वर्षाच्या पुस्तकांना कोरी-कोरी *कव्हरं* घालणं ही शाळेची खरी सुरुवात. पुस्तकांच्या गराडयात बसून, कात्री हातात घेऊन, काळजीपूर्वक *कव्हर* घालण्याची मजा काही औरच. नव्या वर्षाची अशी सुरुवात करत असताना *कव्हरंही* घालण्याआधी, घरी आणल्याआणल्या, पुस्तकं आणि वह्यांवरून हात फिरतोच. न हाताळलेले, न चुरगळलेले, चुरचुरीत कागद... त्याचा स्पर्शही तसाच अगदी ताजा आणि कोरा करकरीत. नकळत पुस्तक आणि वही नाकाशी जाते आणि त्याचा भरभरून वास घेतला जातो. काय बरं म्हणावं या वासाला? कसा असतो हा वास? पुस्तकगंध... हो हो पुस्तकगंधच हा. खास जूनचा पुस्तकगंध. जून उलटला की येत नाही असा गंध पुस्तकांना.

कोरी पुस्तकं आणि वह्या इतक्या निर्मळ दिसतात, की पहिल्या पानावर पटकन लिहिलं जातं 'श्री' किंवा 'ॐ.' दुसरी भावनाच मनात येत नाही त्यावेळी. फक्त श्री किंवा ॐ अशा पवित्र भावनेनीच बघावंसं वाटतं या पानांकडे. शैक्षणिक वर्षाची सुरुवातच कशी प्रार्थना म्हणावी ना, तशी होते. नव्या वह्या आणि पुस्तकांच्या आखीवरेखीव, कोऱ्या पानांकडे पाहून वर्षभर नीटनेटकं आखीवरेखीव लिहिण्याचा संकल्प हमखास केलाच जातो. 'यावर्षी वही अगदी नीट ठेवणार मी! इतकं सुंदर लिहिणार, की माझी वही बघत राहावीशी वाटेल. पुस्तकं देखील नीट ठेवेन.' प्रत्येकजण असाच संकल्प करतो मनात. कोरून कोरून चांगल्या हस्ताक्षरात नावं घालावंसं वाटतं. पानं पुन्हापुन्हा उलटून पाहावीशी वाटतात. परत परत दोन बोटांच्या चिमटीत धरून पानांचा स्पर्श अनुभवावासा वाटतो. कागद-कोरा-स्पर्श. जून उलटला, की परत जाणवत नाही असा कागद-कोरा-स्पर्श.

मोठ्ठी अशी एप्रिलपासून चालू झालेली सुट्टी कधी एकदाची संपते असं होतं. दिवस संपता संपत नसतो. हो, सुट्टीचासुद्धा अगदी कंटाळा येतो. सुट्टीतल्या शिबिरांचा कंटाळा आलेला असतो. दिवसभर घरीच राहायचा कंटाळा येतो. वाटायला लागतं कधी शाळा सुरू होईल. आठवायला लागतात शाळेतल्या गंमती- जमती. कधी कधी तर शाळेची घंटा ऐकू यायला लागते. शाळेत गेल्याशिवाय सगळे मित्र मैत्रिणी भेटणार कसे? त्यांच्या बरोबरची मस्ती करणार कशी आणि कुठे? शाळेत सगळ्यांनी एकत्र जायचं आणि एकत्र यायचं याची धम्माल तर दुसऱ्या कशातच नाही. त्यामुळेच तर दप्तराचं ओझं हलकं होतं ना. एकमेकांना सहाय्य करत पूर्ण केलेला गृहपाठ, प्रकल्प आणि त्यासाठी केलेल्या नाना तऱ्हा. स्नेहसंमेलन, *स्पोर्टस्* डे, सगळं सगळं आठवायला लागतं आणि

*रानामधले हिरवे घरटे जपून ठेवा। सजीव सळसळ मुठीत घेऊन श्वास भरावा।।*

**जरूर पाहा : बिर्ला विज्ञान संग्रहालय,** तेलंगणा (तारांगण, डायनोसॉरसंबंधी संग्रहालय)

**प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिस्टन, अमेरिका**

ओढच लागते परत शाळेत जाण्याची, परत वर्गात बसण्याची, वर्ग सोबतींना भेटण्याची, एकत्र डबा खाण्याची, संगे गप्पा मारण्याची. अगदी शाळेतल्या तासांचीसुद्धा. खरं की नाही?

*मनात दाटून येते इच्छा,*
*परत शाळा गाठण्याची*
*मनात दाटून येते ऊर्मी,*
*वर्गात नव्या शिरण्याची*
*तीच शाळा, तेच सोबती,*
*परत येतात माझ्याचसाठी*
*मनात दाटून येते काही,*
*कळत नाही कशासाठी?*

अशा या कोऱ्या दिवसांमध्ये मग सुरू होते तीच शाळा. पण काय गंमत घडते कोण जाणे तीच ती नेहमीची शाळा, दिसते मात्र नवी. शाळा तीच, पण वर्ग नवा. मित्र-मैत्रिणी त्याच, पण भेट नवी. बाक तेच, पण जागा नवी. विषय तेच, पण वेळापत्रक नवं. आणि सगळ्यांत मुख्य म्हणजे इयत्ता नवी. वरच्या वर्गात गेला आहे किंवा गेली आहे या प्रगतीपुस्तकातल्या वाक्याचा अनुभव खरा येतो, तो जूनच्या नव्या वर्षातच. कॉलर ताठ होते पुढच्या इयत्तेत गेल्यामुळे. कसं मोठं झाल्यासारखं वाटतं. आपल्याला तर वाटतंच; पण आपल्या आई-बाबांनासुद्धा वाटतं की मोठा झाला हो किंवा मोठी झाली हो. नव्याची नवलाई अशीच चालू राहते जूनमधे.

*नवा वर्ग, नवे शिक्षक,*
*नवे वर्ष, नवे पर्व*
*दरवर्षीची तीच शाळा,*
*कसे नवे होते सर्व ?*

कोऱ्या करकरकरीत जूनसाठी, आम्ही सज्ज होतो पुन्हा. नव्या कोऱ्या शाळेकडे वळतात पावले, खरं आहे ना?

जूनची चाहूल म्हणजे जशी शाळेची चाहूल लागते तशीच चाहूल लागते ती आषाढाची. जून महिन्यात शाळा सुरू होते तसाच सुरू होतो पाऊस. आकाशात मोठे काळे ढग दाटी करतात. हवेत गारवा येतो. ढोल नगारे वाजवत पाऊस तडतडत येतो तो पावसाची गार चाहूल घेऊनच. जीवाची तगमग कमी होते. जून महिना आला की कवी म्हणू लागतो

*आला आषाढ-श्रावण*
*आल्या पावसाच्या सरी,*
*किती चातक चोचीने*
*प्यावा वर्षा ऋतू तरी.*

एप्रिल-मे मधल्या उन्हाने काहिली केलेली असते. मग चातकासारखीच वाट पाहात असतो आपण पावसाची, अगदी कोरड्या पडलेल्या जमिनीसारखी.

घरं, झाडं, गाड्या, रस्ते सगळं सगळं धुतलं जातं. अगदी लख्ख- एखाद्या गृहिणीने दिवाळीला



*रोपाचे जरी जंगल झाले, नकोच तुडवू। जमीन, पाऊस, झाडे यांनी जीवन घडवू।।*

**जरूर पाहा : नागपूर मध्यवर्ती संग्रहालय,** नागपूर (नाणी, प्राचीन दस्तऐवज, लेख)

**प्रायोजक - श्री. अतुल कुलकर्णी, पुणे**

आपलं घर लख्ख करून डबे चमकवावेत तसं! लांबून पाहताना आपलंच घर स्वच्छ होऊन कसं नवं दिसत. धुळीची पुटं नाहीशी होतात आणि मुळचा रंग पुन्हा उभारी घेतो.

*झाडं टवटवीत होतात,*
*नवीन पाणी पिऊन*
*पान अन् पान चमकतं,*
*पोपटी रंगात न्हाऊन*
*रस्ते आपलेसे वाटतात,*
*गढूळ पाण्याने वाहणारे*
*कागदी होड्या तरंगतात,*
*असतात कुठे वल्हवणारे?*
*जमीन काठोकाठ भरते,*
*पाण्याच्या ओघळांनी*
*कशी कोण जाणे,*
*बियांची पाने होतात वेगाने*

पाण्याचे लोट आकाशातून जमिनीवर येतात आणि नदी नाल्यांना नव्याने येतो पूर. नद्या दुथडी भरून वाहायला लागतात. जमिनीच्या तुकड्याला नव्याने गंगामाई येऊन मिळते, पुन्हा उभारी येते जमिनीला आणि तिच्या पोटातून अंकुर फुटतात कोरे-नवे. करडी काळी जमीन आता हिरवागार शालू नेसते. डोळ्यांना गार विसावा देते.

पाण्याचा पहिला शिडकावा झाला, की मातीलाही येतो नवा खास सुगंध, तीच नेहमीची माती घेऊन येते नवा-कोरा गंध. पाण्याचे नवीन तुषार येऊन मिसळले, की तापलेल्या मातीला मिळतो तिचा स्वतःचा अनोखा मृद्‌गंध. घरात नव्या कोऱ्या वह्यांचा, पुस्तकांचा पुस्तकगंध आणि अंगणात दरवळतो मृद्‌गंध. दोन्ही गंधांनी वातावरण घमघमत असतं.

जून महिन्यात काय चमत्कार होतो कोण जाणे, पण नवीनच दिसतं सगळं. नवीन होतं सगळं. नवलाईचा रंग आणि गंध वेगवेगळ्या रूपांत घेऊन जून येतो दरवर्षी. पुन्हा रुजण्यासाठी, रुजवण्यासाठी आणि नव्याचा कोरा अनुभव तुम्हाला-मला देण्यासाठी. नवीन गणवेश घालून, नवं दप्तर घेऊन, नव्या इयत्तेत जाताना आपणही नवेच होतो जणू. कोणी वेगळेच. लुटूया चला तो पुस्तक-गंध, कागद-कोरा-स्पर्श, मित्र मैत्रिणींची नव्या वर्षातली नवी कोरी भेट, नवीच वाटणारी तीच शाळा, नवीन इयत्ता आणि हवाहवासा पाऊस नवा !!

❁❁

**- सुनीला गोंधळेकर**
'श्री' बंगला, तुकाराम सोसायटी,
संतनगर, अरण्येश्वर, पुणे ९.

## ✼ आदरांजली ✼



श्री. निनाद गंगाधर बेडेकर यांचे १० मे २०१५ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. श्री. निनाद बेडेकर हे इतिहासाचे गाढे अभ्यासक म्हणून सर्वांना माहिती आहेत. ते व्यवसायाने मेकॅनिकल इंजिनिअर होते. तरुण वयात शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या सान्निध्यात ते आल्यावर 'भारत इतिहास संशोधक मंडळा'त शास्त्रीय पद्धतीने बेडेकरांनी शिवचरित्राचा तपशीलात अभ्यास सुरू केला. देश परदेशातील अनेक गड-किल्ल्यांना भेटी देऊन, त्यांचा तुलनात्मक अभ्यास करून तो लालित्यपूर्ण लेखनातून वाचकांसमोर आणला. शिवचरित्र, अटकेपार झेंडे व पानिपतची लढाई यावर देश-परदेशात पाच हजारांहून अधिक व्याख्याने दिली. ऐतिहासिक साधने, दस्तऐवज, दुर्मीळ कागदपत्रांचा त्यांनी अभ्यास केला. **महाराष्ट्रातील दुर्ग, शर्थीचे शिलेदार, दुर्गवैभव, हसरा इतिहास, इतिहास दुर्गांचा** अशी त्यांची ग्रंथसंपदा होय. 'छात्र प्रबोधन'शी त्यांचा जवळचा संबंध होता. विद्यार्थ्यांसाठी अनेक ऐतिहासिक कथांचे लेखन त्यांनी छात्र प्रबोधनच्या अंकातून केले.

त्यांच्याविषयी लिहिताना 'शिवभक्तितून साकारलेला इतिहासकार' असे त्यांचे वर्णन करायला हवे.

**श्री. निनाद बेडेकर यांच्या स्मृतिस 'छात्र प्रबोधन' परिवारातर्फे विनम्र अभिवादन!**

*पानोपानी इथे निथळते, किलबिल पाखरगाणे। रानफुलांना पाहून हरखून, होती दिवस दिवाणे।।*

**जरूर पाहा : सारनाथ संग्रहालय,** सारनाथ, उत्तरप्रदेश (बुद्ध व बोधिसत्त्वाबाबत शिल्पे, पुरावशेष)

**प्रायोजक - श्री. विद्याधर जोगळेकर, पुणे**

मुलांचे पान

# गुहेतील रहस्य

मिनी, पिंकी, विरेन आणि राजू यांच्याबरोबर पियूषदादाही होता. बराच वेळ चालल्यावर ते जंगलाच्या मध्यावर येऊन पोहोचले; रात्र पण होत आली होती. या किर्रर्र जंगलात आपण एकटेच आहोत, हे आठवल्यावर मनात सगळेच देवाचा धावा करीत होते.

मिनी, पिंकी, विरेन, राजू हे मुख्य पुण्याचे. शाळेत आठवीत शिकणारी ही मुलं. आता तुम्ही म्हणाल, ''अरे मग ही मुलं इथं जंगलात आली कशी?'' त्यामागे असंच एक कारण आहे.

एकदा वर्गात त्यांच्या बाई त्यांना धडा शिकवत होत्या. त्यामध्ये गुहेचं वर्णन होतं. वन्य प्राण्यांनाच काय पण अश्मयुगीन माणसालाही तिचा किती आणि कसा उपयोग झाला? गुहेत काय काय गुपितं दडलेली असतात. हे सगळं ऐकून मुलांना गुहेबद्दल कुतूहल वाटू लागलं. गुहा पाहण्याची त्यांना उत्सुकता वाटू लागली. पण गुहा थोडीच रस्त्यावर सापडणार आहे? त्यासाठी जंगलात जावं लागेल. मग काय मोहिमेला सुरुवात झाली.

एकदा *नेटवर सर्च* करत असताना विरेनला एका जंगलाची माहिती मिळाली. पण हे काम त्यांना एकट्याने जमणारे नव्हते. म्हणून त्यांनी त्यांचा विश्वासू दादा म्हणजेच पियूषदादाला ही गोष्ट सांगितली. पियूदादा तर काय मुलखाचा उत्साही. लोक जसे गिरिप्रेमी असतात ना तसा तो जंगलप्रेमी! तो तर काय एका पायावर तयार झाला.

पण त्यानं घरी 'मुलांना जंगल भटकंतीला नेतोय.' एवढंच सांगितलं. जंगलात गुहेच्या शोधात चाललोय हे सांगितलं नव्हतं. हे असं सांगितलं असतं तर मुलांच्या घरच्यांनी परवानगी दिलीच नसती. पण पिंकीच्या आजीचा मात्र पियूषवर विश्वास होता. आजीला जुजबी कल्पना देऊन ते निघाले.

सुरुवातीला ते रामपूर नावाच्या गावात आले. गावातूनच जंगलात जाण्याची पायवाट होती. त्यांनी सकाळीच चालायला सुरुवात केली. जंगलात बराच वेळ चालत राहिले; पण त्यांना गुहा काही केल्या दिसेना. पण त्यांना निसर्गाचा खूप सुंदर सहवास लाभला. मन अगदी प्रसन्न झाले.

आत्तापर्यंत चालत ते जंगलाच्या मध्यावर आले होते. तोपर्यंत अंधार पडला होता. खूप थकले होते. हे पियूषदादाच्या लक्षात आले. तो म्हणाला ''आता आपल्याला इथेच राहावे लागेल.'' बोलणं खूप सोपं होतं; पण सुरक्षित जागा शोधणं खूप अवघड. आता काय करायचं सर्वांनाच प्रश्न पडला. तेवढ्यात पिंकीला काहीतरी दिसले. अरे, ती तर गुहा होती!

सगळ्यांच्याच हातात विजेऱ्या होत्या. सगळेच मग पिंकी आणि पियूषदादाच्या मागे गेले. गुहा पाहून सर्वांना खूप आनंद झाला. हायसे वाटले. तेव्हा पियूषदादा म्हणाला ''थांबा, आपल्याला माहीत नाही या गुहेत काय आहे? कोणी आहे की नाही? मी खात्री करून आलोच.'' विजेरी घेऊन तो गुहेत शिरला. तर अवाकच झाला. एवढी मोठी गुहा त्याने पहिल्यांदाच पाहिली होती. दादाने इशारा करताच, त्याच्या मागून हे चौघेही आत शिरले. त्यांनी तिथेच रात्रभर राहायचे ठरवले. आतमध्ये बऱ्यापैकी थंडी होती. मग दादाने छोट्या-मोठ्या काड्या जमा करून शेकोटी पेटवली. आपापले डबे सर्वांनी बाहेर काढले. सर्वांनाच सपाटून भूक लागली होती. मात्र राजूला कसला तरी आवाज आला. पण





*झरझर झरती पाऊसधारा क्षणात वाहे वारा। इथल्या वातावरणामध्ये आनंद फिरतो न्यारा।।*



**जरूर पाहा : कच्छ संग्रहालय,** भुज, गुजरात (कच्छ लोकांच्या भाषेतील लेख, चित्तदालन, ऐरावत हत्तीची भव्यमूर्ती)

**श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे**, सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायंकाळी), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

सुरुवातीला त्याच्यावर कुणीच विश्वास ठेवला नाही. ''भास झालाय तुला,'' सारेच म्हणाले. पण पियूषदादा म्हणाला, ''मी आजूबाजूला बघून येतो.'' त्याला जमिनीवर पावलांच्या काही खुणा दिसल्या. मग पियूषनी पावलांचा मागोवा घ्यायचं ठरवलं. पावलांचे ठसे मानवी असून ते गुहेच्या आत-आत जात होते. पियूषदादाने सगळ्यांना बोलावून ते ठसे दाखवले.

रात्र बरीच झाली होती; पण 'ही पावलं नक्की कुणाची आहेत हे आपण शोधायचंच' असं त्यांनी ठरवलं. बरेच आत गेल्यावर त्यांना पेटलेल्या मशाली दिसल्या. हातात जाड आणि लांब काठ्या असलेली दोन माणसं त्यांना दिसली. त्या माणसांना आपण दिसणार नाही, अशाप्रकारे मुलं उभी राहिली. तितक्यात त्यांच्या लक्षात आले की एका आठ-दहा वर्षांच्या मुलीला हात-पाय बांधून तिथे ठेवले आहे. ती मुलगी गुंगीत होती. त्या मुलीचा चेहरा नीट पाहिल्यावर मिनीला आठवलं, की या मुलीचे अपहरण झाल्याचा फोटो वर्तमानपत्रात आला होता. 'हरवली आहे' असा मजकूर तिथे छापला होता. सगळे चांगलेच घाबरले होते. पण तेवढ्यात ती दोन माणसे गुहेला पडलेल्या छोट्या खिंडारातून बाहेर निघून गेली. ती माणसं गेल्याची खात्री झाल्यावर पियूषदादाने त्या मुलीचे



हातपाय सोडले. तिला मुलांजवळ आणले. कपड्यांवरून तर ती श्रीमंत घरातली वाटत होती. तिला थोडे पाणी आणि सँडविच दिल्यावर तिने ते भरभर खाल्ले आणि सांगितले, की तिच्या वाढदिवसाच्या दिवशीच तिला या चोरांनी पकडून आणले आणि या गुहेत लपवून ठेवले. तिला घेऊन सगळेजण दबकत गुहेच्या तोंडापाशी आले.

गुहेतून बाहेर आल्यावर त्यांनी बॅटरी लावली नाही. ते सगळे एका झुडपामागे लपून बसले. चांदणं पडल्यामुळे काहीसं दिसत होतं. थोड्या वेळात दोघांमधला एक चोर त्यांना येताना दिसला. मुलांनी चोराला थोडं पुढे जाऊ दिलं आणि मागून दादानं त्याच्या अंगावर झडप घातली. त्या बेसावध चोराला पकडलं आणि हातात येईल त्या वस्तूने सर्वांनी चोप दिला. आणि त्याला बांधून ठेवले. थोड्या वेळानं दुसरा चोरही आला. त्यालाही बेसावध असताना मुलांनी गाठला व दोरानं बांधून ठेवलं.

तोपर्यंत पहाट झाली होती. चोरांना घेऊन या जंगलातून बाहेर कसे पडायचे हा यक्षप्रश्नच उभा राहिला होता. आश्चर्य म्हणजे जंगल भटकंती करणाऱ्या अजून एका गटानं या मुलांची मदत केली.

सगळेजण रामपूर गावात आले. चोरांना पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी मुलीच्या आई-बाबांना बोलावले आणि मुलीला त्यांच्या ताब्यात दिले. पियूषदादाबरोबर मुलं घरी आली.

पोलिसांनी घरी फोन करून मुलांच्या आईबाबांना सगळं सांगितलं होतं आणि कौतुकही केलं होतं. त्यामुळे घरी मुलांचे स्वागत आनंदात झाले. मुलांचा जीव भांड्यात पडला. छोट्या स्मिताबरोबर मिनी, पिंकी, विरेन, राजू आणि पियूषदादा सगळ्यांचा फोटो दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात झळकला होता.

❁❁

– **कु. वेदाक्षी जोगळेकर** (इ. ९वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

*भात खाचरे गवत नाचरे, वाऱ्यावर सळसळते। जणु वाटते नितळ झऱ्याचे, पाणी खळखळते।।*

**जरूर पाहा : साबरमती आश्रम,** अहमदाबाद, गुजरात (गांधीजींच्या वस्तू, गांधीजींची प्रसिद्ध खोली – हृदयकुंज)

**प्रायोजक - श्रीमती उमा परांजपे, पुणे**

# प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष १५/९)

**हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...**

या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ जुलै २०१५ पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

**प्रश्नांची उत्तरे लिहा**

१) इतिहास विषय रंजक होण्यासाठी लेखिकेने लेखात कोणत्या अभ्यासपद्धती मांडल्या आहेत?

२) भूकंपामुळे होणारी जीवितहानी टाळण्यासाठी कोणत्या प्रकारचे उपाय लेखकाने सुचवले आहेत?

३) 'ढोल्या' या कथेत पप्पांच्या वाढदिवसाच्या दिवशी पप्पा अनिलला काय गिफ्ट देतात आणि का?

४) शालेय वर्षाच्या सुरुवातीच्या जून महिन्याचे स्वागत तुम्ही कसे करता ते ८ ते १० ओळीत लिहा.

५) 'ऊठ मुला' या कवितेत कवीने कोणता संदेश दिला आहे?

---

# जरा हसूया



एक मुलगा मैदानात सायकल चालवत होता. त्याची आई त्याच्याकडे अभिमानाने बघत होती.

पहिली चक्कर मारून होताच तो आईला म्हणाला, ''बघ आई... हाताशिवाय...''

दुसरी चक्कर मारून होताच तो म्हणाला, ''बघ आई !.... पायाशिवाय...''

तिसरी चक्कर होताच किंचाळला, ''आई, दातांशिवाय...''


एका कवी संमेलनाला अफाट गर्दी पाहून एक कवी आयोजकांना म्हणाला, ''वा !... तुमच्या गावात कवितेवर प्रेम करणारे बरेच रसिक श्रोते दिसताहेत.''

''ते श्रोते नाहीत.'' आयोजक म्हणाले, ''ते सर्व कवी आहेत. स्टेजवर बसायला जागा नाही म्हणून ते सर्व खाली बसले आहेत.''






हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ ज्येष्ठ, शके १९३७, १ जून २०१५ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.


  

## अशी ही कल्पकता...



थोडीशी गंमत...

– वैजनाथ दुलंगे/मधुजा पारगावकर



सौर ज्येष्ठ, शके १९३७/जून २०१५ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ ज्येष्ठ, शके १९३७ /१ जून २०१५
पंजीकरण क्रमांक (RNI NO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 /2015 - 2017,
Posted at S.P. Post Office, Pune - 30, on 1st of Every Month

सौर दिनदर्शिका
शके १९३७

| | जून २०१५ | ज्येष्ठ आषाढ |
|---|---|---|
| सो. | 1 | ११ |
| मं. | 2 | १२ |
| बु. | 3 | १३ |
| गु. | 4 | १४ |
| शु. | 5 | १५ |
| श. | 6 | १६ |
| र. | 7 | १७ |
| सो. | 8 | १८ |
| मं. | 9 | १९ |
| बु. | 10 | २० |
| गु. | 11 | २१ |
| शु. | 12 | २२ |
| श. | 13 | २३ |
| र. | 14 | २४ |
| सो. | 15 | २५ |
| मं. | 16 | २६ |
| बु. | 17 | २७ |
| गु. | 18 | २८ |
| शु. | 19 | २९ |
| श. | 20 | ३० |
| र. | 21 | ३१ |
| सो. | 22 | आ.१ |
| मं. | 23 | २ |
| बु. | 24 | ३ |
| गु. | 25 | ४ |
| शु. | 26 | ५ |
| श. | 27 | ६ |
| र. | 28 | ७ |
| सो. | 29 | ८ |
| मं. | 30 | ९ |



सकाळच्यावेळी सिंहगडावर भ्रमंतीसाठी गेलो होतो तेव्हा झाडावर क्षणभर विश्रांतीसाठी जणू टेकलेला 'स्वर्गीय नर्तक' (Asian Paradise Flycatcher) दिसला. हा एक स्थलांतरित पक्षी आहे, जो ऑक्टोबर ते मार्चच्या दरम्यान आपल्याकडे पाहायला मिळतो. याला छबीबद्ध करणारा कॅमेरा होता Canon 7d व लेन्स होती Canon 100 - 400

हर्षद भुर्के, me.mechartist@gmail.com

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☏ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ २०/-
वार्षिक वर्गणी : ₹ २००/-

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -